# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील गावठाण भागात क्लस्टर योजना राबविणेबाबत

**(१) ५४१२ (२०-०३-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका स्थापन करतांना २३ खेड्यांचा म्हणजेच गावठाणांचा त्यात समावेश करण्यात आला होता परंतु मागील अनेक वर्षांपासुन गावठाणाच्या पुनर्वसनासाठी जादा चटई क्षेत्र देण्याची मागणी असतांना देखील अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महनगरपालिका हद्दीतील गावठाणांच्या विकासासाठी क्लस्टर योजना राबविणेबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) असल्यास, नाशिक शहरातील २३ खेड्यांनाही क्लस्टर योजनेंतर्गत गावठाण भागात जादा चटई क्षेत्र वाढवून देण्याबाबत शासनस्तरावरुन धोरणात्मक निर्णय घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२३) :** (१) नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरासाठी सुधारित प्रारुप विकास योजना, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर केली होती. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.४० "Cluster Development for core area" अंतर्गत नाशिक महानगरपालिकेने वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित केले होते. शासनाने सदरहु विनियम क्र.४० "Cluster Development for core area" बाबत निर्णय स्थगित ठेवून उर्वरीत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह विकास योजनेस अधिसुचना क्र. टिपीएस-१११६/प्र.क्र.१४०(अ)/२०१६/ नवि-९, दि.०९/०१/२०१७ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

दरम्यानचे काळात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. ६१/२०१४ मध्ये ठाणे, नवी मुंबई व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक प्रस्तावित करण्यापुर्वी आघात मुल्यमापन अहवाल करण्यात आलेल्या नसल्याची व या संबंधी आदेश होण्याची विनंती मा. न्यायालयास करण्यात आली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने ठाणे, नवी मुंबई व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रस्तावित वाढीव चटई क्षेत्र संदर्भात आघात मुल्यमापन अहवाल प्राप्त केल्याखेरील कार्यवाही न करण्याबाबतचे निर्णय उक्त जनहित याचिका क्र. ६१/२०१४ मध्ये दिलेले होते. त्यानुसार ठाणे, नवी मुंबई व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रस्तावित वाढीव चटई क्षेत्र संदर्भात आघात मुल्यमापन अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे समुह विकास योजनेतील (Cluster Development) वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर करताना सदर वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकामुळे तसेच शहरातील पायाभूत सुविधांवर होणाऱ्या परिणामा संदर्भात आघात मुल्यमापन अहवाल (Impact Assesment Report) तयार करणे बाबत इतर महानगरपालिकेकडून कार्यवाही झालेली आहे. त्यामुळे समूह विकास योजनेतील वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करताना सदर वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकामुळे शहरातील सोयी सुविधांवर होणारा परिणाम/आघात यांचा सर्वकष अभ्यास करुन आघात मुल्यमापन अहवाल शासनास सादर करणेबाबत नाशिक महानगरपालिकेस पत्र क्र. टिपीएस-१११६/प्र.क्र. १४०(अ)/२०१६/नवि-९,दि.१३/०७/२०१८ अन्वये निर्देश देण्यात आले होते. त्यावर नाशिक महानगरपालिकेने 'आघातमुल्यमापन अहवाल' (Impact Assesment

Report) तयार करणेसाठी "क्रिसील" या संस्थेची नेमणूक केली होती. क्रिसील या संस्थेकडुन तयार करण्यात आलेला 'आघात मुल्यमापन अहवाल' (Impact Assesment Report) नाशिक महानगरपालिकेने दि.१४/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये (शासनास प्राप्त दि.२७/११/२०२०) शासनास सादर केला आहे.

(२) व (३) दरम्यानच्या कालावधीत राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / महानगरपालिका / नियोजन प्राधिकरण / विशेष नियोजन प्राधिकरण यांच्यासाठी एकत्रिकृत सर्व समावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करण्याबाबत शासनाने दि.०८/०३/२०१९ रोजी सूचना प्रसिध्द केली होती व प्रसिध्द केलेल्या सूचनेवर प्राप्त हरकती / सूचनेवर संबंधितांना सुनावणी देऊन शासनास अहवाल सादर करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांकडुन शासनास अहवाल सादर झाल्यावर संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला मसलत करुन दि.०२/१२/२०२० च्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिलेली आहे. सदरहु अधिसूचनेचे प्रसिध्दीकरण दि.०३/१२/२०२० रोजीच्या शासन राजपत्रात झालेले असुन उक्त नियमावली दि.०३/१२/२०२० पासुन लागू झालेली आहे. सदर एकत्रिकृत सर्व समावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.१४.८.१ अन्वये महानगरपालिका हद्दीतील दाटवस्ती/ गावठाण भागात ४००० चौ.मी. क्षेत्रावर ' Urban Renewal Scheme' क्लस्टरच्या स्वरुपात राबविण्याबाबत प्रस्तावित तरतूद वैधानिक कार्यवाहीची पुर्तता करुन अंतिम करण्यात आलेली आहे. ' Urban Renewal Scheme' अंतर्गत अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक संबंधीची तरतुद क्रमांक १४.८.६ अन्वये करण्यात आलेली आहे. सदरहु तरतुदी अंतर्गत नाशिक शहरातील गावठाण भागातील मोडकळीस/ धोकादायक इमारतीचे क्लस्टरच्या स्वरुपात किमान ४.०० चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत विकास अनुज्ञेय होवू शकेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडोरच्या कामाबाबत

**(२) १४४८८ (२०-०९-२०२०). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडोरचे काम प्राधान्याने हाती घेण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आढावा बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गासाठी भूसंपादन आणि प्रत्यक्ष कामाची जबाबदारी राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्याचा निर्णय दिनांक ७ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीत निश्चित करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प सद्या पर्यावरण सीआरझेड, वन आणि वन्यजीवन विभागांच्या मध्ये अडकून पडल्याने माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत सदर मार्गिका सुरू करण्याचे नियोजन किंवा लक्ष्य गाठणे शक्य होणार नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१), (२) व (३) हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास दि.१९.०८.२०२० रोजी हस्तांतरीत करण्यात आला आहे. महामंडळाने पर्यावरण, सीआरझेड, वन व वन्यजीवन विभागाच्या परवानग्या जलद गतीने मिळण्याकरीता कार्यवाहीचे काम सुरु केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पद्मभुषण आदरणीय ति.डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलाची देखभाल दुरूस्तीबाबत

**(३) ३२५२७ (०२-०२-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या निधीमार्फत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने उभारलेल्या पनवेल

शहरातील एसटी बस डेपोसमोरील राष्ट्रीय महामार्ग ४ वरील पद्मभुषण आदरणीय डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलाची देखभाल दुरूस्ती अभावी वाहन चालक व नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात पुलावर मोठया प्रमाणात ठिकठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे तसेच पडलेल्या लहानमोठ्या खड्डयांमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी मुंबई महानगर विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या दोन विभागाने करण्यास नकार दिल्यामुळे अतिशय महत्त्वाचा असलेला उड्डाणपुल दुरूस्ती अभावी धोकादायक ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उड्डाणपुलाची देखभाल दुरूस्ती मुंबई महानगर विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या दोन विभागाकडे देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सदर पुलाची दुरुस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सन - २०२१ अखेर पर्यंत करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

पुलावर पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती पावसाळयात करण्यात आली होती. तसेच सदर पुलावर पावसाळयात साचलेल्या पाण्यामुळे किंवा खड्ड्यांमुळे कोणतेही अपघात झाल्याची नोंद वरीष्ठ पोलीस निरिक्षक, पनवेल शहर, यांनी त्यांच्या दिनांक १७.१२.२०२१ च्या पत्राप्रमाणे आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

सदर उड्डाणपुल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून हस्तांतरित करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पनवेल महानगरपालिका यांना सदरचा उड्डाणपूलाचा ताबा घेण्याबाबत अनेक वेळा कळविले आहे. तथापि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पनवेल महानगरपालिकेने आजपर्यंत सदर उड्डाण पुलाचा ताबा घेतलेला नाही. सदर उड्डाणपूल हा मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ या रस्त्यावर आहे व या उड्डाणपूलाचे देखभाल व दुरूस्तीचे काम सद्यस्थितीत मे.आय.आर.बी. एमपी एक्सप्रेसवे प्रायवेट लिमिटेड या कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एच-पूर्व विभाग (मुंबई) वाकोला येथील कार्यालयाच्या प्रस्तावित नवीन इमारतीबाबत

**(४) ३२६९० (११-०१-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एच-पूर्व विभाग (वाकोला, मुंबई) या कार्यालयाची इमारत अत्यंत जीर्ण झाली असल्याने उक्त इमारतीमधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याने इमारतीस धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने या इमारतीमधील विभाग इतरत्र स्थलांतरीत करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांना प्रचंड गैरसोईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सिटी सर्व्हे क्रमांक ३४५४ डी व ३४५४ ई व्हिलेज कोलेकोकण, वाकोला येथील सुई ज्युइली (ग्रॅण्ड हयात) यांचेकडून सुविधा क्षेत्र अंतर्गत सुमारे ३००० स्वेअर/फुट क्षेत्रफळाचा महापालिकेच्या ताब्यात असलेल्या भूखंडावर एच-पुर्व विभाग कार्यालयाकरीता सुसज्ज इमारत बांधावी याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागाकडे पत्राद्वारे सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित महापालिका उपायुक्त, परिमंडळ-३ के/पूर्व विभाग कार्यालय, अंधेरी (पूर्व) यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करुनही अदयाप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पूर्व विभागातील सिटी सर्व्हे क्र. ३४५४ डी व ३४५४ ई या भूखंडावर एच/पूर्व विभाग कार्यालयाची नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.
त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वास्तुविशारद विभागामार्फत नियोजित विभाग कार्यालय इमारतीचे आराखडे इमारत प्रस्तात (विशेष कक्ष) विभागाकडे मंजुरीकरीता सादर करण्यात आले असून, आवश्यक त्या मंजुरी प्राप्त झाल्यानंतर निविदा मागवून काम करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## दक्षिण मुंबईतील भेंडीबाजार पुनर्विकास प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या भूखंडाच्या संपादनाच्या कार्यवाहीबाबत

**(५) ३२७८६ (११-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पहिला आदर्श समुह प्रकल्प अशी ओळख बनलेल्या दक्षिण मुंबईतील भेंडीबाजार पुनर्विकास प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या भूखंडाच्या संपादनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे मुंबई महानगरपालिकेला किती जागा मिळणार आहे,
(३) असल्यास, उक्त पुनर्विकास प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे व या भागाच्या पुनर्विकासामुळे विस्थापित होणाऱ्या रहिवाशी व दुकानदारांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२३) :** (१) व (२) मुंबईतील भेंडीबाजार नियोजित समूह पुनर्विकास प्रकल्पाचे क्षेत्रफळ ६५,४२९.०० चौ.मी. असून त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एकूण ४७६२.०९ चौ.मी. क्षेत्रफळाचे २४ भूभाग (प्रकल्पाच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७.२८%) अंतर्भूत आहेत.
सदर २४ भूभागांच्या बदल्यात प्रकल्पाचे विकासक मे. सैफी बुरहाणी अपलिफ्टमेन्ट ट्रस्ट (एस.बी.यु.टी.) यांच्या खाजगी २ भूखंडाचे क्षेत्रफळ ५५४७.४९ चौ. मी. च्या अदलाबदल करण्याच्या प्रस्तावास सुधार समिती व महानगरपालिकेच्या अनुक्रमे दिनांक २९.०९.२०२१ व दिनांक २१.१०.२०२१ अन्वये मंजुरी मिळाली आहे.
सदर मंजुरीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण २४ भूभागाचा ताबा एस.बी.यु.टी. यांना देण्यात आला असून, विकासक मे. एस.बी.यु.टी. यांच्या मालकीच्या २ भूखंडांचा आभासी आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला आहे.
तद्नंतर एस.बी.यु.टी. कडून सदर भूखंडांचा ताबा दिल्याच्या तारखेपासून महानगरपालिकेच्या धोरणानुसार अधिमूल्य वसूल करुन सदर दोन भूखंड एस.बी.यु.टी. ला ३० वर्षांच्या कालावधीकरिता मक्त्याने देण्यात येणार आहेत. यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेस एस.बी.यु.टी. कडून रु. १४.३० कोटी इतके अधिमूल्य मिळेल. तसेच प्रतिवर्षी रु. ५६००/- इतके भुईभाडे आकारण्यात येणार आहे.
(३) सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये कोणतीही तरतूद नाही. तथापि एस.बी.यु.टी. मार्फत सदर प्रकल्प २०२७ च्या अखेरीस पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.

सदर पुनर्विकासामुळे अंदाजे ३२०० निवासी व १२०० अनिवासी रहिवाशी बाधीत होत असून विस्थापित होणाऱ्या २५१४ निवासी रहिवाशांची म्हाडा वसाहत (घोडपदेव) भायखळा, म्हाडा वसाहत (चुनाभट्टी) व अंजिरवाडी (भायखळा) व व ५९८ दुकानदारांची भेंडीबाजार से.नं. २ (व्यावसायिक संक्रमण शिबिर) व मुफद्दल शॉपिंग आर्केड, डोंगरी येथे एस.बी.यु.टी. मार्फत पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच भेंडीबाजार सेक्टर ३ या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून, या इमारतीत ६१४ निवासी व १२३ अनिवासी रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

उर्वरित ७२ निवासी व ४७९ अनिवासी विस्थापित रहिवाशांना एस.बी.यु.टी. मार्फत घरभाडे देण्यात येते.

सदर समूह योजनेतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निगडीत भूभागावरील भाडेकरुंचे पुनर्वसन मे. एस.बी.यु.टी. स्वत:च्या जबाबदारीवर व स्वखर्चाने करणार आहे. तसेच, भूखंडावरील विद्यमान बांधकामाचे पुनर्विकासाकरिता निष्कासन करेपर्यंत परिरक्षणाची जबाबदारी एस.बी.यु.टी. यांची असणार आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचे स्मारकाच्या कामाबाबत**

**(६) ३३०७२ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक मुंबईतील इंदू मिल येथील उभारण्याचा निर्णय शासनाने यापूर्वीच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सामाजिक न्याय मंत्री यांचे अध्यक्षतेखाली माहे जून, २०२१ मध्ये सामाजिक न्याय राज्यमंत्री व संबंधित शासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत झालेल्या बैठकीत सदर स्मारकाचे ४८ टक्के काम पूर्ण झाले असल्याचे त्यांचेकडून सांगण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारकाचे काम अद्याप किती अपूर्ण आहे व उर्वरित काम पूर्ण होण्यास किती अवधी लागणार आहे तसेंच कामाच्या सद्य:स्थितीची माहिती दर्शनी भागात लावण्यांत यावी यासह काम पूर्ण होण्याचे दृष्टीने आवश्यक त्या निधी उपलब्धतेसह शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले याबाबत सद्यस्थिती काय आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सद्यस्थितीत स्मारक इमारत व पुतळा यांचे ९ टक्के काम पूर्ण झाले असून प्रकल्पातील सहाय्यभूत इमारतीचे ४९ टक्के काम पूर्ण झाले आहे व उर्वरित कामे प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय लेखापाल सेवा संवर्गातील कर्मचाऱ्यांचे वेतनश्रेणीतील तफावतीबाबत**

**(७) ३३१४२ (०२-०२-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दि. २९.१.२०१० च्या राजपत्रान्वये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील लेखापाल व लेखापरिक्षक श्रेणी अ, ब आणि क साठी किमान शैक्षणिक अर्हता एम.कॉम किंवा बी.कॉम व सी.ए./ आय.सी.डब्लु.ए. निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार किमान शैक्षणिक पात्रतेनुसार राज्यात सुमारे २० लेखापाल व लेखपरिक्षक श्रेणी क यांच्या नियुक्ता सन २०१७ पूर्वी करण्यात आल्या असून, या लेखापाल व लेखापरिक्षक यांना ६ व्या वेतन आयोगानुसार रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे ४२०० ही वेतन श्रेणी लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दि. ३/७/२०१७ व ३०/१/२०१८ या राजपत्रानुसार सदरील पदांसाठी श्रेणी अ, ब, क साठीची शैक्षणिक अर्हता एम.कॉम किंवा बी.कॉम व सी.ए./ आय.सी.डब्लु.ए. ऐवजी वाणिज्य शाखेतील पदवी एम.कॉम / बी.कॉम अशी शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, श्रेणी अ, ब, क साठी अनुक्रमे ६ व्या वेतन आयोगानुसार रु.९,३००-३४,८०० ग्रेड पे ४,४०० रुपये, ९,३००-३४,८०० ग्रेड पे ४,३०० आणि ९,३००-३४,८०० ग्रेड पे ४,२०० निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, सदर प्रकरणी २० लेखापाल यांनी शासनाकडे अनेकदा पत्रव्यवहार करुनही शासनाने त्यांना न्याय दिला नसल्याने, सन २०१७ पुर्वी नियुक्त करण्यात आलेले लेखापाल व लेखापरिक्षक यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी तसेच माहिती व निर्णय घेऊन सदर तफावत दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) संबंधीत कर्मचारी यांची नियुक्ती ही त्या वेळच्या सेवाभर्तीप्रमाणे करण्यात आलेली असून उमेदवारांना निवडीसाठी घेतलेल्या स्पर्धा परिक्षेतील गुणांप्रमाणे श्रेणी देण्यात येते, शैक्षणिक अर्हतेप्रमाणे श्रेणी देण्यात येत नाही. त्याप्रमाणे या कर्मचाऱ्यांची निवड झालेली असून, या संदर्भाधीन त्यांचे अपिल निकाली काढण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महापालिकेतील रस्त्यांच्या विविध कामांचा लेखाजोगा सादर करण्याबाबत

**(८) ३३२७२ (०२-०२-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिका दरवर्षी रस्त्यांच्या कामांसाठी हजाराहून अधिक कोटी रुपयांची तरतूद करुन निधी खर्च होऊनही मुंबईतील रस्त्यांवर खड्डे पडत असतात व ते खड्डे पुन्हा भरण्यासाठी पुन्हा कंत्राट देण्याचे सत्र गत २५ वर्षापासून सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने आता रस्ते दुरुस्तीसाठी तब्बल १२०० कोटी रुपयांच्या निविदा काढल्या असून अंदाजित रक्कमेपेक्षा ३० ते ४० टक्के कमी दराने काम करण्याची तयारी कंत्राटदारांनी दाखवली असल्याची बाब दि. १७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ३० टक्के कमी दरात भरलेल्या रस्ते कामांच्या निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविण्यात येऊन गत २५ वर्षांतील रस्त्याच्या विविध कामांची व सद्यःस्थितीची श्वेतपत्रिका प्रसिध्द करा अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने रस्त्यांच्या विविध कामांचा लेखाजोगा सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या कामाच्या रु. १२१३.५० कोटीच्या निविदा माहे मार्च, २०२१ मध्ये ३० व माहे जुलै, २०२१ मध्ये ४ अशा एकूण ३४ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर निविदा कंत्राटदाराने उणे २१ ते ३० वर उध्दृत केल्याने कामाचा दर्जा राखण्यासाठी सर्व निविदा रद्द करण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

मुंबई क्षेत्रात मोठया प्रमाणात पडणारा पऊस, मुंबई शहराची भौगोलिक स्थिती आणि विविध सेवा उपयोगिता कंपन्यांमार्फत होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळयात पाण्याच्या संपर्कामुळे खड्डे पडतात. सदर खड्डयांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटकरणाद्वारे मजबुतीकरण/सुधारणा करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे.

दरवर्षी पावसाळयादरम्यान रस्त्यांवर पडणाऱ्या खड्डयांची समस्या कमी व्हावी याकरिता सन २०२१-२२ पासून ६ मी. रुंदीवरील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. तसेच, स्थायी तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या निर्देशानुसार रस्ते दुरुस्ती व सुधारण्याची कामे करण्यात येतात.

तथापि अद्यापही मुंबईमध्ये साधारणत: १२०० किमीचे डांबराचे रस्ते असल्यामुळे पावसाळयात खड्डे पडतात. सदर खड्डे ४८ तासांत बुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) माहे मार्च-एप्रिल २०२१ मध्ये रस्ते कामांसाठी मागविण्यात आलेल्या निविदा रद्द केल्यानंतर, नव्याने मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये कंत्राटदाराबरोबर मालाचा पुरवठा करणारे पुरवठादार, काँक्रिट तयार करणारे संयंत्र मालक, धुम्रजंतु संयंत्र पुरवठादार मालक यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. तसेच कंत्राटदाराने उणे १२% पेक्षा अधिक रक्कम उध्दृत याकरिता काम पूर्ण केल्या उणे २०% पर्यंत अतिरिक्त १% व उणे २०% पेक्षा जास्त रक्कम उध्दृत केल्यास २% अतिरिक्त सुरक्षा रक्कम डी.डी. स्वरुपात कंत्राटदाराकडून आगाऊ घेणे, गुणवत्ता नियंत्रणसाठी गुणवत्ता व्यवस्थापन संस्थेची नेमणुक करणे, तसेच रस्ते दोषदायित्व कालावधीत व निश्चित आयुर्मान कालावधीत चांगल्या स्थितीत रहावेत झाल्यानंतर अनुज्ञेय देयकांच्या ८०% रक्कम व उर्वरित २०% रक्कम संबंधित रस्ते कामांच्या दोषदायित्व कालावधीत सुरु झाल्यापासून तो पूर्ण होईपर्यंत दरवर्षी प्रमाणामध्ये देण्याची अट अंतर्भूत करण्यात आलेली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मीरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील इतर महानगरपालिका क्षेत्रात 'डिजिटल शाळा' संकल्पना राबविण्याबाबत

**(९) ३३४७० (०२-०२-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी ‘डिजिटल शाळा’ हि संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मिरा भाईंदर शहरात ’डिजिटल शाळा’ ही संकल्पना राबविण्याच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मीरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील इतर महानगरपालिका क्षेत्रात ’डिजिटल शाळा’ ही संकल्पना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०२-२०२३) :** (१) राज्य शासनाने सन २०१५ मध्ये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये डिजीटल वर्ग तयार करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने महापालिकेच्या ७९५३ वर्ग खोल्यामध्ये स्वखर्चाने डिजीटल वर्ग सुरू केलेले आहेत.

सन २०१७-१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण १२१४ वर्ग खोल्यांमध्ये डिजीटल वर्गाची उभारणी करण्यात आलेली आहे.

तद्नंतर सन २०२०-२१ मध्ये १३०० वर्ग खोल्या डिजीटल करण्यात आल्या आहेत.

(२) मा. लोकप्रतिनिधींचे अशा आशयाचे निवेदन शालेय शिक्षण विभागास प्राप्त झालेले आहे.
(३) मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेच्या एकूण ३६ शाळा असून, त्यापैकी ११ शाळांमध्ये डिजीटल वर्ग कार्यान्वित आहेत.

सदर ११ शाळांना डि-मार्ट द्वारे सी.एस.आर. निधीतून डिजीटल वर्ग तयार करण्यात आलेले आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सिस्टीम विभागामार्फत सदर शाळांसाठी प्रोजेक्टर व स्क्रिन उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेच्या अग्निशमन विभागामध्ये पाच हजार करोड रूपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(१०) ३३६४९ (२५-११-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेच्या अग्निशमन विभागामध्ये सुमारे पाच हजार करोड रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महापालिकेने दिनांक ३ मार्च, २०१४ ते ६ जून, २०२१ पर्यंतची अग्निशमन सेवा फी विकासकाकडून वसूल करण्याऐवजी सोसायटीमधील सामान्य नागरीकांकडून वसुल करण्याबाबत अग्निशमन विभागाने दिनांक ७ जून २०२१ रोजी परिपत्रक क्रं. २३ काढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अग्निशमन सेवा फी भरल्याशिवाय विकासकांना अग्निशमन विभागाने ना-हरकत परवाने दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीअंती महापालिकेच्या अग्निशमन विभागातील गैरव्यवहारा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिनांक ०७.०६.२०२१ रोजी परिपत्रक प्रसारीत केले हे खरे आहे.

तथापि दिनांक ०३.०३.२०१४ ते ०६.०६.२०२१ पर्यंत अग्निशमन सेवा शुल्क प्रथमत: विकासक/वास्तुविशारद यांचेकडून वसूल करण्यात येणार आहे.

तसेच, दिनांक ०७.०६.२०२१ पासून अग्निसुरक्षेच्या दृष्टीने ना-हरकत/पूर्तता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अग्निशमन दलाकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक इमारत प्रस्तांवावर लागू असलेले अग्निशमन सेवा शुल्काची वसुली इमारतीचे विकासक/वास्तुविशारद यांच्याकडून अनुसूची II भाग १ मध्ये नमूद केलेल्या दरांनुसार वसूल करण्यात येत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) व (६) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील इमारतींना अग्निशमन सेवा शुल्क व वार्षिक शुल्क न आकारल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी पूर्ण करण्यात आली असून, चौकशीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले आहेत:-

तत्कालीन प्रमुख अग्निशमन अधिकारी व तत्कालीन उपप्रमुख अग्निशमन अधिकारी (प्रशासन) यांचेविरुध्द खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशी करण्यात येत आहे.

अग्निशमन दलातील ४ अग्निशमन अधिकारी व ४ उपप्रमुख अग्निशमन अधिकारी यांपैकी एक अग्निशमन अधिकारी यांचे निधन झाल्यामुळे व उर्वरित तीन प्रमुख अग्निशमन अधिकारी तसेच चार उपप्रमुख अग्निशमन अधिकारी (प्रशासन) यांचा सदर पदावरील सेवाकार्यकालावधी हा अल्प असून ते सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अधिनियम २००६ नुसार अग्निशमन सेवा शुल्क व वार्षिक शुल्क आकारणीबाबत निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक ०७.०६.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार त्वरेने कार्यवाही करण्याबाबत प्रमुख अग्निशमन अधिकारी यांना निर्देश देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मुंबई महापालिकेने गेल्या २४ वर्षामध्ये मुंबईतील रस्त्यांवर २१ हजार करोड रुपयांपेक्षा जास्त रुपये खर्च केले असल्याबाबत**

**(११) ३३७०२ (१७-०१-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने सन १९९७ ते २०२१ मध्ये मुंबईतील रस्त्यांवर २१ हजार करोड रुपयांपेक्षा जास्त रुपये खर्च केले असल्याचे महापालिकेकडून मिळालेल्या माहितीमधून माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील रस्त्यांची स्थिती फारच वाईट असून रस्त्यांमध्ये खड्डे की खड्डयांमध्ये रस्ते असा प्रश्न सर्वसामान्य नागरीकांना पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीअंती मुंबईतील रस्त्यांची स्थिती सुधारण्याबाबत तसेच महापालिकेतील रस्ते विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) मुंबई क्षेत्रात मोठया प्रमाणात पडणारा पऊस, मुंबई शहराची भौगोलिक स्थिती आणि विविध सेवा उपयोगिता कंपन्यांमार्फत होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळयात पाण्याच्या संपर्कामुळे खड्डे पडतात. सदर खड्डयांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटकरणाद्वारे मजबुतीकरण/सुधारणा करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे.

दरवर्षी पावसाळयादरम्यान रस्त्यांवर पडणाऱ्या खड्डयांची समस्या कमी व्हावी याकरिता सन २०२१-२२ पासून ६ मी. रुंदीवरील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. तसेच, स्थायी तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या निर्देशानुसार रस्ते दुरुस्ती व सुधारण्याची कामे करण्यात येतात.

तथापि अद्यापही मुंबईमध्ये साधारणत: १२०० किमीचे डांबराचे रस्ते असल्यामुळे पावसाळयात खड्डे पडतात. सदर खड्डे ४८ तासांत बुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेस्ट उपक्रमातील कर्मचारी करोना भत्त्यापासून वंचित असल्याप्रकरणी..

**(१२) ३३७८७ (०२-०२-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करोनाकाळात सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना बेस्ट उपक्रमाने दररोज ३०० रुपये करोना भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोनाकाळात जिवावर उदार होऊन काम करणाऱ्या बेस्ट उपक्रमातील चालक, वाहकांसह विद्युत, अभियंता विभागातील शेकडो कर्मचारी करोना भत्त्यापासून वंचित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना करोना भत्ता विनाविलंब देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) बेस्ट उपक्रमातील संबंधित कर्मचाऱ्यांना दिनांक २३ मार्च, २०२० ते दिनांक २२ जून, २०२० या कालावधीपर्यंत कोरोना भत्त्याचे प्रदान करण्यात आले आहे.

तद्नंतर पुरेशा निधीअभावी सदर भत्त्याचे प्रदान करणे शक्य झाले नाही असे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आर्थिक निधिबाबत पाठपुरावा करण्यात आला आहे. तसेच महानगरपालिकेकडून अनुदान स्वरुपात मिळणारा निधी पुरेसा नसल्याने सदर कोविड भत्त्याचे प्रदान करणे शक्य झालेले नाही असे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील रस्ते कायमस्वरुपी खड्डेमुक्त करण्याबाबत

**(१३) ३४१७७ (०२-०२-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्त्यांवर मुंबई महापालिकेने मागील दोन दशकांमध्ये नवीन रस्त्यांची दुरुस्ती, देखभाल आणि बांधकामांवर तब्बल २१ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिका एक खड्डा भरण्यासाठी १७ हजार ते २३ हजार रुपये आकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास नियोजन १९९१ ते २०३४ या आराखड्यामध्ये मध्ये सांताक्रुझ पोलीस ठाणे आणि गझ्झर बंदला जोडणारे असे दोन बोगदे प्रस्तावित करण्यात आले असून ते अद्याप प्रलंबित असल्यामुळे मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर प्रचंड प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून या वाहतुक कोंडीमुळे ४० हजार कोटींहून अधिक नुकसान सोसावे लागत असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या योग्य निर्णय आणि योग्य पध्दतीचा अभाव हे मुंबईतील रस्त्यावर खड्डे पडण्याचे प्रमुख कारण असल्याचे आढळून आले असून, रस्त्याचा दर्जा राखण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखणे अपेक्षित असतानाही महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष व टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई शहर कायमस्वरुपी खड्डेमुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरळी स्थित धुम्रजंतु संयंत्र येथे उत्पादित केलेले कोल्ड मिक्स महानगरपालिकेच्या २४ प्रशासकीय विभाग कार्यालयांत मागणीनुसार पुरविण्यात येते. सदर कोल्ड मिक्सचा वापर पावसाळयातील खड्डे बुजविण्यासाठी महानगरपालिकेच्या कामगारांमार्फत करण्यात येतो.

सदर कोल्ड मिक्सची बॅग २५ किलोची असते. साधारणत: १ चौ.मी. खड्डा ज्याची खोली ३० मिमी. ते ४० मिमी. असते असा खड्डा बुजविण्यासाठी साधारणत: ३ ते ४ कोल्ड मिक्सच्या बॅग्ज वापरण्यात येतात. सदर कोल्ड मिक्सचा उत्पादित खर्च रु. २८/- प्रतिकिलो इतका येतो. यास्तव १ चौ.मी. खड्डा बुजविण्यासाठी रु. २१०० ते रु. २८००/- इतका खर्च येतो.

दोषदायित्व कालावधीमध्ये अंतर्भूत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे संबंधित कंत्राटदाराकडून भरण्यात येतात व याकरिता कंत्राटदारास कोणत्याही प्रकारचे अधिदान करण्यात येत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सांताक्रुझ पोलीस ठाणे व गझ्झर बंद येथे जोडणारे दोन बोगदे हे विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीखालून जात असल्यामुळे सदर जागेची आय.आय.टी. मुंबई यांचेमार्फत जागेची पाहणी करण्यात आली असून, त्यांच्या अभिप्रायानुसार शक्यशक्यतेची पडताळणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

विकास आराखड्यामधील नियोजित आरक्षणाचे भूसंपादन व नियोजित वापर याबाबत महानगरपालिकेच्या प्राधान्यतेनुसार होणारी अंमलबजावणी, महापालिका क्षेत्रामध्ये मेट्रो रेल्वेची प्रगतीपथावरील कामे, नागरिकांची सार्वजनिक वाहतूक वापरासंबंधी अनिच्छा आणि दिवसागणीक वाढत जाणारी खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या इत्यादी बाबींमुळे मुंबईतील पश्चिम उपनगरामध्ये प्रमुख रस्त्यांवर प्रचंड प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) मुंबई क्षेत्रात मोठया प्रमाणात पडणारा पाऊस, मुंबई शहराची भौगोलिक स्थिती आणि विविध सेवा उपयोगिता कंपन्यांमार्फत होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळयात पाण्याच्या संपर्कामुळे खड्डे पडतात. सदर खड्डयांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटकरणाद्वारे मजबुतीकरण/सुधारणा करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे.

दरवर्षी पावसाळयादरम्यान रस्त्यांवर पडणाऱ्या खड्डयांची समस्या कमी व्हावी याकरिता सन २०२१-२२ पासून ६ मी. रुंदीवरील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. तसेच, स्थायी तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या निर्देशानुसार रस्ते दुरुस्ती व सुधारण्याची कामे करण्यात येतात.

तथापि अद्यापही मुंबईमध्ये साधारणत: १२०० किमीचे डांबराचे रस्ते असल्यामुळे पावसाळयात खड्डे पडतात. सदर खड्डे ४८ तासांत बुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मुंबईतील जलस्त्रोताचे पुर्नरुज्जीवन करण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत**

**(१४) ३४२१३ (१७-०१-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाची नोंद होत असून येथील प्रशासन किंवा कोणतीच यंत्रणा पावसाचे पाणी जमिनीत मुरुन जलसाठा वाढावा म्हणून कार्यान्वित नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी, गत २० वर्षांत मुंबईतले सुमारे ९० टक्के जलस्त्रोत चोरीला गेले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित यंत्रणेला माहिती देखील होणार नाही अशाप्रकारे जलस्त्रोत नष्ट करण्यात आले असून सदर प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर कारवाई अपेक्षित असतानाही संबंधित विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील अनेक वर्षांत पाणी प्रश्नाबाबत महापालिकेकडे एकूण १० समित्या नियुक्त करण्यात आल्या, सदर समित्यांनी तांत्रिक दृष्टीकोनातून अनेक उपाययोजना सुचविल्या परंतु महापालिकेने त्यावर कोणत्याच प्रकारची अंमलबजावणी केली नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील पाण्याची गरज लक्षात घेता मुंबईतील जलस्त्रोताचे पुर्नरुज्जीवन करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२३) :** (१) मुंबई शहर आणि उपनगरात सरासरीच्या तुलनेत अधिक पाऊस होत असून, पावसाचे पाणी जमिनीत मुरुन जलसाठा वाढावा याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

सुधारीत विकास आराखडा २०३४ नुसार, दिनांक ०८.०५.२००८ पासून नवीन विकासाकरिता येणाऱ्या ५०० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या सर्व भूखंडांकरिता वर्षा संचयन व विनियोग करण्याची अट बंधनकारक करण्यात आली आहे.

त्यानुसार इमारत बांधकामास मंजुरी देतांना वर्षा संचयन प्रकल्पाची बांधणी करण्याबाबतची अट ना-मंजुरीच्या अटी व शर्तीच्या प्रमाणपत्रात समाविष्ट करण्यात येते.

वर्षा संचयन प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर झाल्याची खात्री केल्यानंतरच इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते.

(२) व (३) एखाद्या विकासकाने विकसित होत असलेल्या भूखंडावर विहीर बुजवण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ अन्वये कारवाई करण्यात येते.

तसेच एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने अथवा खाजगी मालकाच्या जागेमधील विहीर बुजवत असल्याचे किंवा बुजविली असल्याचे आढळून आल्यास योग्य ती कारवाई करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबईतील पाणी प्रश्नाबाबत नियुक्त केलेल्या चितळे समितीच्या सन १९९४ च्या सूचना अहवालानुसार व शासनाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने "समान व २४ x ७ पाणी पुरवठयाकरिता" स्थापन केलेल्या तज्ञ समितीच्या सूचना व अहवालानुसार कार्यवाही सुरु आहे.

चितळे समितीच्या अहवालानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने मध्य वैतरणा धरण प्रकल्प पूर्ण करुन कार्यान्वित केला आहे. तसेच पाणी पुरवठ्यातील गळती रोखण्यासाठी स्वतंत्र गळती अन्वेषण विभाग कार्यरत आहे. तसेच २०० एमएलडी क्षमता असलेला नि:क्षारीकरण प्रकल्प मनोरी येथे उभारण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरु आहे. मुंबई शहराला भविष्यात अधिक पाणी पुरवठा करण्याकरिता गारगाई, पिंजाळ आणि दमणगंगा प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतची व्यवहार्यता पडताळण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तज्ञ समितीच्या सूचना व अहवालानुसार, सहायक शोषण टाक्या, बुस्टर पंप बसविणे, स्काडा प्रणाली नुतनीकरण, नवीन जलमापके/प्रवाह मापके बसविणे, ग्राहक माहिती नुतनीकरण, मोठी गृहसंकुले व मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करणाऱ्या आस्थापनांची देखरेख, प्रभागांतील पाणी पुरवठा विभाग व नवीन प्रभाग यांचा अभ्यास, पाणी गळती रोखणे, पाण्याची नासाडी व चोरी रोखणे, पाण्याचा पुनर्वापर, पर्जन्य जलसंचयन व विनियोग, नवीन जलस्त्रोतांची निर्मिती इत्यादी अनेक सूचनांची अंमलबजावणी व कार्यवाही होत आहे. तसेच विविध सुधारणा कार्यक्रम/प्रकल्प हाती घेण्यात आले असून इतर सुधारणा कार्यक्रम/प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता अभ्यास व पडताळणी सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) अस्तित्वात असलेल्या खाजगी गृहनिर्माण संस्था/ मालमत्ताधारकांना वर्षा संचयन व विनियोग योजना राबविण्याबाबत उत्तेजन देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्थापित केलेल्या वर्षा संचयन व विनियोग आणि पाणी बचत कक्षातर्फे प्रस्तावित योजनेचे संकल्पन विनामूल्य करुन देण्यात येते.

तसेच, इमारतीच्या आवारामध्ये नवीन कूपनलिका खणण्याची परवानगी देताना वर्षा संचयन व विनियोग पध्दतीने इमारतीच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याने कूपनलिकेमार्फत भूजलाचे पुनर्भरण करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अट घालण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहराच्या पाणीपुरवठया प्रकरणी नियोजनच्या अभावामुळे उपाययोजना राबविण्याबाबत**

**(१५) ३४४६२ (०२-०२-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत (GSDA) सन २००७ मध्ये पुणे शहराच्या भूजल स्तराचा अभ्यास करण्यात येऊन त्यांचे अभ्यासानुसार पुण्यात पाणी भरपूर परंतु त्याचा अयोग्य वापर असा निष्कर्ष सदर अहवालाद्वारे सर्वेक्षण यंत्रणेने काढला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार पुणे शहराच्या मध्यभागात मुबलक पाणी तर उपनगरांमध्ये पाणी उपलब्धच नसणे अशी स्थिती असल्याने त्यामध्ये एकीकडे नियोजनाचा अभाव तर दुसरीकडे भूजल पातळी तपासणारी यंत्रणाच महापालिकेकडे नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २००७ नंतर शहरातील पाणी प्रकरणी नव्याने अभ्यास करण्यात आला नसल्याने सन २००७ मध्ये काढण्यात आलेले निष्कर्ष अद्याप कायम असल्याने दरम्यानच्या काळात शहराच्या भौगोलिक व पाणीपुरवठा परिस्थितीत झालेल्या बदलामुळे त्याप्रकरणी नव्याने अभ्यासगट नेमून जलसंवर्धन व जलपुर्नभरण संदर्भात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करुन उपाययोजना राबविण्याची आवश्यकता निर्माण झाल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०१-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. पुणे महानगरपालिकेने पुणे शहराच्या भूजल स्तराचा अभ्यास करण्याचे काम भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (GDSA) या संस्थेला दिले होते. मात्र प्राप्त अहवालामध्ये पुणे शहरामधील पाणी वापराचा उल्लेख नाही.
(२) प्राप्त अहवालामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, शहराच्या पेठ भागामध्ये पाणी जास्त आहे, तर उपनगरामध्ये तुलनेने पाणी (Yield) कमी तसेच भूजल पातळी तपासणी करण्याचे काम हे भूजल सर्वेक्षण विकास विभाग (GSDA) यांचे मार्फत करण्यात येत असल्याने सदरची यंत्रणा पुणे महानगरपालिकेकडे असण्याची आवश्यकता नाही.
(३) व (४) भूजल सर्वेक्षण हे सन २००७ मध्ये केले असल्याने व त्यानंतर शहराच्या भौगोलिक व पाणीपुरवठा परिस्थिती मध्ये झालेल्या बदलामुळे नव्याने अभ्यास गट नेमून पुन्हा सर्वेक्षण हाती घेणे गरजेचे आहे, ही बाब खरी आहे. त्यानुसार भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत (GSDA) नव्याने अभ्यास गट नेमून जलसंवर्धन व जलपुनर्भरण संदर्भात सर्वेक्षण अहवाल तयार करण्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येईल, असे महानगरपालिकेने कळविले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या जी-उतर विभागातील रस्तारुंदीकरण प्रकल्पातील**
**बाधित झालेल्या रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१६) ३४६०९ (१७-०१-२०२२). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जी-उतर विभागातील मनसूख कावेठीया, शिवबाई खाकोरडीया, नाझिरा बादशाह शेख, नसीम हसन मुजावर व दिलीप देसल उग्रेजीया येथील रहिवाशी रस्ता रुंदीकरण प्रकल्पातील पात्र बाधित रहिवाशी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वि.नि.नि.३३(१५) व अन्वये या पात्र बाधित रहिवाशांचे नावे ज्या विकासकाला ज्या ठिकाणावरील ना-हरकत प्रमाणपत्र व चटई निर्देशांक देण्यात येतो त्याने नियमाप्रमाणे त्याच ठिकाणी त्यांचे पुर्नवसन करणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प बाधीताचे नियमाप्रमाणे त्याच विभागात व त्या ठिकाणी पुर्नवसन करण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, फसवणूक करणाऱ्या विकासावर कठोर कारवाई करून वि.नि.नि.३३(७) मधील अटीप्रमाणे बाधित रहिवाशांचे पुनर्वसन होईपर्यंत इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र न देणे, इमारतीचे काम चालू आहे परंतु बाधित रहिवाशांचे पुनर्वसन आराखड्यात दाखवले नसल्यास अशा कामांना स्टॉप वर्क नोटीसा देणे, सदर विकासाच्या अन्य विकासकामात मंजुरी न देणे इत्यादी कारवाई करणेसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभाग कार्यालयाकडून प्राप्त ना-हरकत प्रमाणपत्रानुसार नमूद प्रकल्पबाधीतांचे नाव मंजूर आराखड्यामध्ये समाविष्ट आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मजास (जोगेश्वरी मुंबई) येथील न.भू. क्रमांक ५० व ५१ येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेची नविन विभागीय कार्यालये उभारण्याबाबत**

**(१७) ३५४२३ (१७-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (मुंबई) विधानसभा क्षेत्रात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे के / पूर्व आणि पी / दक्षिण हे दोन प्रभाग येत असून येथील नागरिकांना त्यांच्या कामानिमित्त या महानगरपालिकेच्या कार्यालयात जाणे प्रवासाच्या दृष्टीकोनातून सोयीस्कर होत नसल्याने मौजे मजास, जोगेश्वरी पूर्व येथील न. भू. क्रमांक ५० व ५१ येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेची नवीन विभागीय कार्यालये उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री व पालकमंत्री, मुंबई उपनगर यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरहू ठिकाणी नविन विभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत उपायुक्त (सा.प्र) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यासंदर्भात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी यापूर्वी निर्देश देऊनही सदरहू समितीचे आजपर्यंत गठन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू समितीचे गठन करण्याबाबत आजवर झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत सदरहू विलंबास जबाबदार असणारे संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) तसेच सदरहू प्रस्तावित समिती तातडीने गठीत करून या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने उक्त नमूद जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेची नवीन विभागीय कार्यालये स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व व पी/दक्षिण या विभाग कार्यालयांसाठी जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आजगांवकर मैदान येथील प्लॉट क्रमांक ५१ व ५२ या भूभागावर नवीन विभाग कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना विनंती केली होती.

सदर विनंतीस अनुसरुन सह आयुक्त (परि.४) व सह आयुक्त (करनिर्धारक व संकलक) यांची दिनांक १४.१२.२०२० रोजी महानगरपालिका आयुक्तांच्या मंजुरीने द्विसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.
(५) व (६) सदर द्विसदस्यीय समितीने विद्यमान के/पूर्व विभागाचे के/दक्षिण व के/उत्तर विभाग असे विभाजन करण्याबाबतचा अहवाल दिनांक २७.१०.२०२१ रोजी सादर केला असून, के/पूर्व विभागाच्या विभाजनाच्या गटनेत्यांच्या

बैठकीत सादर करावयाच्या प्रस्तावास महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी प्राप्त करुन दिनांक २२.१२.२०२१ अन्वये महानगरपालिका चिटणीस यांना सदर प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर अद्यापही निर्णय अप्राप्त आहे.

---

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच (पश्चिम) व के (पश्चिम) वॉर्डमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने आर्थिक अनियमितता करून करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत**

**(१८) ३६४६३ (०२-०२-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच (पश्चिम) व के (पश्चिम) वॉर्डमध्ये मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात येत असून सदरहू अनधिकृत बांधकामांबाबत वारंवार तक्रारी दाखल करूनही सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास एच (पश्चिम) वॉर्डमधील खार पश्चिम येथील आफिया हाईट्स ही इमारत मंजूर आराखडयानुसार न बांधता सदरहू इमारत बांधताना वाहनतळ व डक्ट एरियाकरिता राखीव जागेचा अनधिकृतरित्या वापर केल्याचे तसेच मनपाच्या इमारत प्रस्ताव विभागातील नस्ती क्रमांक सीई/२६०७/डब्ल्यूएस/अेएच नुसार खार पश्चिम येथे अनधिकृतरित्या इमारत उभारण्यात आली असून एच (पश्चिम) वॉर्डात अशीच आणखी ११ अनधिकृत बांधकामे असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच के (पश्चिम) वॉर्डमधील फिशरीज युनिर्व्हसिटी, वर्सोवा येथील केदारनाथ टॉवर, बद्रीनाथ टॉवर, आशी कॉम्प्लेक्स येथे बांधकाम करताना चटई क्षेत्र निर्देशांकाच्या वापरात नियमांचे उल्लंघन केले असून डक्ट एरिया व फ्लावर बेड एरियाचा बेकायदेशीररित्या वापर करण्यात आल्याचे तसेच एस.व्ही.रोड येथील ई.ई.हाईट्स व जोगेश्वरी मनपा रूग्णालय येथील ओशिवरा गार्डन या इमारती अनधिकृतरित्या व विनापरवानगी उभारण्यात आल्या असून यासारखी आणखी अशीच ३०० अनधिकृत बांधकामे के (पश्चिम) वॉर्डमध्ये करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता लाईफ इन लाईट या सेवाभावी संस्थेने माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका, माहे जानेवारी २०२१ मध्ये वा त्या दरम्यान सहाय्यक आयुक्त व सहाय्यक अभियंता एच (पश्चिम) वॉर्ड, माहे डिसेंबर २०२० मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त व सहाय्यक आयुक्त एच (पश्चिम) वॉर्ड तसेच सहाय्यक अभियंता एच (पश्चिम), माहे मार्च, २०२० मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, मनपा, माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, आयुक्त, सहाय्यक आुयक्त एच (पश्चिम) वॉर्ड, उपायुक्त परिमंडळ ४, सहाय्यक अभियंता के (पश्चिम) वॉर्ड, माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, मनपा, सहाय्यक अभियंता, सहाय्यक आयुक्त , उपायुक्त परिमंडळ ४ यांना अशा आजवर १० पेक्षा अधिक तक्रारी सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत गेल्या ३ वर्षांपासून सातत्याने तक्रारी सादर करूनही या प्रकरणी निष्कासनाच्या कारवाईस होत असलेला वेळकाढूपणा पाहता या प्रकरणी स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता दुर्लक्ष करणारे संबंधित महानगरपालिका अधिकारी व वॉर्ड ऑफिसर यांच्यावर तातडीने कारवाई करून सदरहू अनधिकृत बांधकामे तातडीने निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(६) नसल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास व अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू कारवाई किती कालावधीत करण्यात येणार असून या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता अनधिकृत बांधकामांना संरक्षण देणारे संबंधित प्रभाग अधिकारी यांना निलंबित करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,

(७) सदरहू अनधिकृत बांधकामांना ३५४, ३५४ अे, ४८८ अन्वये नोटीसी पाठविल्यानंतर सदरहू नोटीसीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकारी हे कर्तव्यात कसूर करीत असून महानगरपालिकेचा स्वत:चा विधी विभाग असूनही संबंधित अनधिकृत बांधकामांना वेळोवळी स्थगिती आदेश कसे मिळतात याबाबत शासनाने विचार करून एमआरटीपी कायद्यांतर्गत आयुक्त, महानगरपालिका यांना असलेल्या अधिकाराचा वापर करून अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित प्रभाग अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांचे विरूध्द एफआयआर नोंदवून कायदेशीर कारवाई करून संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पश्चिम व के/पश्चिम वॉर्डमध्ये अनधिकृत बांधकामांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींवर कायद्यातील तरतुदींनुसार विहित कालावधी कारवाई करण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३), (४), (५), (६) व (७) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पश्चिम वॉर्डमधील "आफिया हाईट्स" या इमारतीमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाला महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली असून, सदर अनधिकृत बांधकामावर दिनांक १८.०३.२०१९ रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

एच/पश्चिम विभागातील १३ अनधिकृत बांधकामांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• ८ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
• १ प्रकरणी निष्कासन कारवाई आयोजित करण्यात आली आहे.
• १ प्रकरणात पक्षकाराने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (झोपुप्रा) येथे बांधकाम नियमित करणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने झोपुप्रा यांनी आराखडे मंजूर केले आहेत.
• १ प्रकरणात सोसायटीने स्वत: बांधकाम काढून टाकले आहे.
• १ प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधकाम नियमित करण्यात आले आहे.
• १ प्रकरणात बी.सी.सी.सी.सुट क्र. २५७० ते २५७९/ २०१६ अन्वये मा. न्यायालयात दावा प्रलंबित आहे.

तसेच, के/पश्चिम विभागातील अनधिकृत बांधकामांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• ई.ई. हाईट्स या इमारतीस दिनांक २१.०६.२०२१ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.
• ओशिवरा गार्डन या एमएमआरडीच्या भूखंडावर स्थित असलेल्या इमारतीमधील अनधिकृत बांधकामांच्या तक्रारींवर वेळोवेळी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.
• केदारनाथ टॉवर व बद्रीनाथ टॉवर या इमारतीस मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४८८ अन्वये नोटीस बजावून स्थळपाहणी करुन मंजूर आराखडा व्यतिरिक्त सदर इमारतीत कोणतेही अनधिकृत बांधकाम आढळल्यास मनपा/एमआरटीपी अंतर्गत योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे.
• म्हाडा नियोजन प्राधिकरण ११८, उपजिल्हाधिकारी (अति. व निष्का.) ११, झोपुप्रा ४, एमएमआरडीए १ अशा एकूण १३४ तक्रारी संबंधित प्राधिकरणास वर्ग करण्यात आल्या असून, महानगरपालिकेशी संबंधित १४३ प्रकरणांपैकी एकूण ६५ प्रकरणांमध्ये निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ नुसार योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कोव्हिड जाहिरातीच्या नावाखाली लाखों रुपयांचा खर्च केल्याबाबत

**(१९) ३७९२४ (०९-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने सिनेमागृहात प्रिंट स्लाईडवर तसेच एसटी बसेस पॅनल फुलरॅपच्या क्रिएटिव्ह

कोव्हिड जाहिरातीच्या क्रिएटिव्हवर रु.३० लाख खर्च केले असून कोणतीही निविदा न काढता शासनाच्या एका पत्रावर खाजगी जाहिरात कंपनीला कोव्हिडच्या नावाखाली लाखोंचा खर्च केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनसंपर्क विभागाने मेसर्स कन्सेप्ट कम्युनिकेशन प्रा. लि. या कंपनीला दिनांक २४ मार्च २०२१ रोजी सादर केलेले रु ३०.९७ लाखांचे देयक अदा केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कोणत्याही प्रकारची निविदा जारी केल्या नसून आयुक्तांच्या मंजुरीवर कार्यादेश जारी केले, सदर कामासाठी २ वेगवेगळे कार्यादेश जारी झाले असून एक कार्यादेश १९ ऑक्टोबर २०२० रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यामार्फत आहे तर दुसरा कार्यादेश बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या जनसंपर्क विभागाने दिनांक २१ डिसेंबर २०२० रोजी जारी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीअंती मेसर्स कन्सेप्ट कम्युनिकेशन प्रा.लि. या कंपनीला विना निविदा कामे देणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर कामाकरिता शासनाने ई-निविदा प्रक्रिया राबवून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नेमून दिलेल्या संस्थेला सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेऊनच कार्यादेश देण्यात आला आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने सुरु केलेली कामं संथगतीने सुरु असल्याबाबत

**(२०) ३७९२५ (०९-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने ४९८ कोटी रुपये खर्च करून ३२ शाळांना नवीन झळाळी देण्यासाठी सन २०१८ पासून सुरु केलेली कामं संथगतीने सुरु असून क्षुल्लक दंड आकारण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने ३२ शाळेसाठी ४९८ कोटी रुपयांचे काम जारी केले असून ३२ पैकी ७ शाळा नवीन जागेवर बांधल्या जात असून २ एल, २ के पूर्व, १ जी उत्तर, १ आर मध्य आणि १ आर दक्षिण या प्रभागात आहेत. त्यापैकी सर्वाधिक ८ शाळेचे काम कुर्ला एल प्रभागात सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३२ पैकी १० कामे वर्ष २०२० मध्ये पूर्ण करणे गरजेचे होते, १६ कामे ही वर्ष २०२१ मध्ये पूर्ण करण्यात येणार होते यापैकी ६ कामांची मुदत संपली असून सन २०२२ मध्ये ५ तर सन २०२३ मध्ये १ काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुर्ला एल प्रभागात ८ कामांवर १११.८५ कोटी खर्च, एन वॉर्डात ११.८४ कोटी खर्च, एम पूर्वेला ३ कामांवर ४३.२९ कोटी तर एम पश्चिमेला २ कामांवर ४१.२४ कोटी खर्च, जी दक्षिण येथील एका कामांवर ८.८४ कोटी, एफ उत्तर येथील २ कामांवर ५०.३१ कोटी, जी उत्तर येथील एका कामांवर २.७७ कोटी, के पूर्व येथील २ कामांवर १६.८४ कोटी, एच पूर्व येथील एका कामांवर १७.३६ कोटी, टी वॉर्ड येथील एका कामांवर २३.१८ कोटी, के पश्चिम वॉर्डातील २ कामांवर ३४.०१ कोटी, पी उत्तर येथील ३ कामांवर ३९.२२ कोटी, आर उत्तर येथील एका कामांवर १४.४४ कोटी, आर मध्य येथील २ कामांवर ४२.१४ कोटी आणि आर दक्षिण प्रभागातील २ कामांवर ४०.९० कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, सदर चौकशीअंती सर्व कामात विलंब झाला असून महानगरपालिकेतर्फे त्रयस्थ व्यक्तीकडून ऑडिट करण्याबाबत तसेच स्थापत्य विषयक आणि विद्युत कामाची गुणवत्ता तपासण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) सदर ३२ शाळांपैकी १ कामाचे कार्यादेश सन २०१७, ११ कामांचे कार्यादेश सन २०१८, १४ कामांचे कार्यादेश सन २०१९ व ६ कामांचे कार्यदेश सन २०२० मध्ये देण्यात आले होते. या सर्व कामांचा कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण होण्याचा कालावधी वेगवेगळा आहे.

सदर ३२ शाळांपैकी १२ शाळांची कामे आजमितीस पूर्ण झाली आहेत व उर्वरित २० शाळांची कामे प्रगतीपथावर असून ती विहित अथवा वाढीव मुदतीत पूर्ण करुन घेण्यात येणार आहेत. कंत्राटदारांच्या चुकीमुळे शाळांच्या कामांमध्ये दिरंगाई झालेल्या कंत्राटदारांवर निविदा व जी.सी.सी. मधील अटी व शर्तींनुसार वेळोवेळी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०२० मधे अकल्पितपणे उद्भवलेल्या कोविड-१९ रोगाच्या महामारीमुळे सर्व व्यवहार ठप्प झाल्याने त्याचा परिणाम शालेय इमारतींच्या कामाच्या प्रगतीवर देखील झाला होता. कामगारांचे स्थलांतर, बांधकाम साहित्याची वानवा यामुळे कामाची गती मंदावली होती.

याबाबत शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १०.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार शाळा पायाभूत सुविधा कक्ष या विभागामार्फत सुरु असलेल्या कामांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे.

कोविड कालावधीतील अनुज्ञेय मुदतवाढ व प्रकल्पातील इतर अडचणींमुळे देय असलेली मुदतवाढ याकरिता नगर अभियंता यांची प्रकल्पनिहाय स्वतंत्र मंजुरी घेण्यात आलेली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळा पायाभूत सुविधा कक्ष या विभागामधील कामांवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची पूर्णवेळ देखरेख असल्यामुळे त्रयस्थ व्यक्तीकडून ऑडिट करण्याची आवश्यकता वाटत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे महानगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रातील नागरिकांना सेवा-सुविधा मिळण्याबाबत

**(२१) ३७९३९ (२०-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महानगरपालिका हद्दीत सन २०१७ पासून एकूण १० गावांचा समावेश झालेला असून हद्दवाढ क्षेत्रातील नागरिकांना अद्यापही प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळाला नसल्याने, स्थानिक नागरिकांनी धुळे महानगरपालिकेत ठिय्या आंदोलन केले असल्याचे दि.३ जानेवारी २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हद्दवाढ क्षेत्रातील नागरिकांना सोयी-सुविधा देण्यासह प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) व (२) शासन अधिसूचना दि.०५/०१/२०१८ अन्वये धुळे महानगरपालिका हद्दीत एकूण ११ गावांचे क्षेत्र समाविष्ट करण्यात आलेले आहे.

गृहनिर्माण विभागाच्या दि.०९/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रात प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

सदर योजना हद्दवाढीने धुळे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट केलेल्या गावांनाही लागू आहे व त्यानुसार महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

सदर योजनेंतर्गत शहरातील २० झोपडपट्ट्यांचे DGPS व्दारे सर्वेक्षण झालेले असून त्यापैकी ०४ झोपडपट्ट्यांचे नियमानुकूल करण्यासाठीचे प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेले आहेत.

सदर योजनेंतर्गत कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून बँकांमार्फत १४५६ लाभार्थींना लाभ देण्यात आलेला आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्याव्दारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान याअंतर्गत धुळे महानगरपालिकेसाठी एकूण ८५० लाभार्थीचा प्रस्ताव मंजूर असून त्यास राज्य शासनाकडून रु.३.४० कोटीचे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी महानगरपालिकेमार्फत रु.२.५३ कोटी रुपये खर्च झालेला असून त्यात २६० लाभार्थींना लाभ देण्यात आलेला आहे.

धुळे महानगरपालिका क्षेत्रात हद्दवाढीने समाविष्ट झालेल्या ११ गावांत महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण सुरु आहे. त्यातील ज्या लाभार्थ्यांच्या नावावर जमीन आहे त्यांना या योजनेचा लाभ लगेच देण्यात.

तथापि सदर हद्दवाढ क्षेत्रातील बहुतांश नागरिक हे सरकारी जमीनीवरील रहिवासी असून त्यांच्या स्वत:च्या मालकी हक्कांचा उतारा नाही.

सदर गावे आत्ताच महानगरपालिकेत समाविष्ट झालेली असल्याने अद्यापही तेथे सिटी सर्वे झालेला नाही. या सर्व अडचणीमुळे तेथील काही नागरिकांना लाभ देणे अवघड होत आहे.

महानगरपालिकेमार्फत हद्दवाढ क्षेत्रातील नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालय, नविन रस्ते, गटारी, अमरधाम विकसित करणे, पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, तसेच इतर मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई वगळाता राज्यातील अन्य महापालिकांच्या हद्दीतील मालमत्ता खरेदी विक्रीची १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभार रक्कम महापालिकांना वितरीत करण्याबाबत

**(२२) ३८०९३ (१८-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वगळता राज्यातील अन्य २६ महापालिकांच्या हद्दीतील मालमत्तांची खरेदी-विक्री देणगी अथवा फलोपयोगी गहाण आदी दस्ताऐवजांवर आकारण्यात येणारी १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभाराची एकुण २३५ कोटी ७१ लाख ९८ हजार ८०९ रुपयांची रक्कम महापालिकांना सन २०२१-२२ या वर्षात राज्य शासनाने वितरीत करण्याचा निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभारामुळे जमा होणाऱ्या रकमेचा पहिला हप्ता संबंधित महानगरपालिका शासन निर्णय मुद्रांक-२०२०/प्र.क्र.१३/नवि-३२ दि. ३१.१२.२०२१ अन्वये रुपये २३५ कोटी ७१ लाख ९८ हजार ८०९ रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मुलुंड (पूर्व) येथील कचराभुमी शास्त्रोक्त पध्दतीने निवारण करण्याचे काम सुरु करण्याबाबत

**(२३) ३८३०४ (२०-०४-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड (पूर्व) येथील कचराभुमी शास्त्रोक्त पध्दतीने निवारण करण्याकरिता महापालिकेने निविदा प्रक्रिया करुन हे काम मेसर्स बायोमायनिंग प्रा. इंडिया लि. या कंपनीकडे ६ वर्षांकरिता देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने माहे मार्च, २०२० पर्यंत फक्त १,१४,००० मेट्रीक टन इतकेच काम केलेले असून हे काम खुपच संथगतीने चालू असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कचराभुमी निवारण करण्याचे काम ठरलेल्या वेळेत पुर्ण होवू शकणार नसल्यामुळे महापालिकेस मोठा आर्थिक भुर्दंड होवू शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील पर्यावरणाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्वाचा असून पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून या कचराभुमीच्या कामांस गती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर कचराभूमीच्या कामास गती मिळण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

- कंत्राटदारास काम अधिक गतीने करण्याच्या व विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- कंत्राटातील अटी व शर्तीनुसार काम विहित वेळेत पूर्ण करण्याचे सूक्ष्म नियोजन कंत्राटदाराकडून घेण्यात आले आहे.
- कंत्राटदाराने सूक्ष्म नियोजनानुसार काम अधिक गतीने करण्याच्या व विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत व जास्त क्षमता असलेल्या वाढीव यंत्रसामुग्री वापरण्यात येत आहेत.
- कंत्राटातील अटी व शर्तीनुसार काम वेळेत पूर्ण न केल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईची तजवीज आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेची मूलभूत सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करण्याबाबत

**(२४) ३८३१५ (२५-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोकसंख्येच्या तुलनेत ८५८ प्राथमिक दवाखान्यांची गरज असताना प्रत्यक्षात त्याच्या केवळ वीस टक्केच, १९९ दवाखाने सध्या कार्यरत असल्याचे 'मुंबई फर्स्ट' आणि 'प्रजा फाऊंडेशन' यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोनाकाळात मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आणि प्राथमिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित झाले असतानाही प्राथमिक आरोग्याच्या पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी केवळ २० टक्के तरतूद मुंबई महानगरपालिकेने आरोग्याच्या अर्थसंकल्पात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेची मूलभूत सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शहरी विभागाकरिता ५० हजार लोकसंख्येसाठी एक शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र (आरोग्य केंद्र + दवाखाना) असे प्रमाणक नमूद करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांमध्ये सर्वाजनिक आरोग्य विभागांतर्गत १९० दवाखाने, २११ आरोग्य केंद्रे, १५ सायंकालीन दवाखाने (दुपारी ४.०० ते रात्री ११.०० पर्यंत) व २८ प्रसुतीगृहे कार्यरत आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये आरोग्य विभागासाठी महसुली व भांडवली खर्चाकरिता रु. ४७३३.१५ कोटी तसेच, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये महसुली व भांडवली खर्चाकरिता रु. ६९३३.७५ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ४६.४९% इतकी वाढीव तरतूद करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महसुली व भांडवली खर्चाकरिता सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या वर्षाकरिता एकूण अर्थसंकल्पीय अंदाजाच्या अनुक्रमे १२.१२% व १५.०९% इतकी तरतूद करण्यात आली आहे.

मुंबईतील नागरिकांना घराशेजारी प्रतिबंधात्मक व प्राथमिक आरोग्य सुविधा देण्याकरिता पहिल्या टप्प्यात कार्यरत दवाखान्यांपैकी एकूण १०० दवाखान्यांचे सक्षमीकरण करुन सदर ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आरोग्य केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत. सदर आरोग्य केंद्रे सुरु करण्याकरिता सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. ४०० कोटीची तरतूद करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रस्तावित हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे या १०० आरोग्य केंद्रांमधून रक्त चाचणी, क्ष-किरण चाचणी, सिटी स्कॅन, मॅमोग्राफी इत्यादी चाचण्या नाममात्र शुल्कावर करण्यात येणार आहेत.

सदर आरोग्य केंद्रांवर टेलिमेडिसीनमार्फत केईएम, सायन, नायर व कुपर रुग्णालय येथील विशेष व अतिविशेष डॉक्टरांचे सल्ले उपलब्ध करण्यात येतील. तसेच मधुमेह, कर्करोग, उच्च रक्तदाब, हृदयरोग इत्यादी आजारांच्या रुग्णांची तपासणी व उपचार करण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवळाली (जि.नाशिक) येथील परिसरात विनपरवानगी वृक्षतोड केल्याबाबत

**(२५) ३८३६२ (२५-०४-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (जि.नाशिक) येथील नाशिक रोड लगतच्या वडनेरगांव, वडनेरगेट परिसरातील वड, पिंपळ, आंबा व कडुनिंब इ. वृक्षांची तेथील महापालिका लोकप्रतिनिधी, उपायुक्त (उद्यान) महापालिका नाशिक, यांच्या आदेशानूसार संबंधित ठेकेदाराने बेकायदेशीरपणे वृक्षतोड केल्याचे तसेच जेलरोड-टाकळीरोड (नाशिक) येथे एका व्यावसायिकाने माजी नगरसेवकांच्या आदेशावरुन पिंपळ, औदूंबर इ. वृक्षांची वृक्षतोड केल्याचेही दिनांक ७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्षतोड प्रकरणी उपरोक्त संबंधितांनी नाशिक महापालिका प्रशासनाची व वृक्षप्राधिकरणाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महापालिका लोकप्रतिनिधी, उपायुक्त (उद्यान) व संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द वृक्षतोड संवर्धन कायदा व वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांचेविरोधी पोलिस कारवाई करण्यात यावी तसेच एक झाड एक लाख रुपये याप्रमाणे संबंधितांकडून वसूली करावी अशी मागणी नाशिक कृती समितीचे पदाधिकारी, तसेच स्थानिक कर्तव्यशील सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व वृक्षप्रेमी जनतेने केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीररित्या वृक्षतोड केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या सर्वप्रकरणी सर्वसंबंधितांच्या विरोधात कारवाई करावी, अशी मागणी दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील नाशिकरोड वडनेर गेट ते पाळदे मळा पर्यंतच्या रस्त्यावरील वड, पिंपळ, आंबा, कडूनिंब अशा एकुण ३४ वृक्षांचा, तसेच वडनेरगाव मारुती मंदिराजवळील पिंपळ व कडूनिंब अशा एकूण ३६ वृक्षांचा विस्तार/उंची अनधिकृतरित्या तोडण्यात आल्याने, संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत सौ.अश्विनी भट व इतर वृक्षप्रेमी यांनी नाशिक महानगरपालिकेकडे तक्रार केली होती. तसेच, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील जेलरोड-टाकळीरोड या ठिकाणी दि.०७/०१/२०२२ रोजी वृक्षतोड झाल्याबाबत नाशिक महानगरपालिकेस कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी उक्त ठिकाणी दि.०९/०१/२०२२ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली व तक्रारीत नमुद वृक्षांच्या फांद्या तोडल्याबाबत चौकशी केली असता, खाजगी ठेकेदार श्री.सोनवणे यांनी मजुरांमार्फत झाडांच्या फांद्या तोडून घेतल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले.
महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम, १९७५ (सुधारित २०२१) चे कलम २१ अन्वये, अनधिकृत वृक्षतोड केल्यास प्रति वृक्ष जास्तीत जास्त रु.१ लक्ष पर्यंत दंड करता येईल, अशी तरतूद आहे.
त्यानुसार नाशिक महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाकडील अनधिकृत व विनापरवानगी वृक्षतोडीकरीता निश्चित करण्यात आलेल्या दि.२७/१२/२०२१ च्या नियमावलीनुसार व वृक्षांच्या मुल्यांकनानुसार महानगरपालिकेमार्फत संबंधित ठेकेदार श्री.सोनवणे यांना रु.२०,३५,०००/- इतक्या रकमेच्या दंडाची नोटीस दि.१२/०१/२०२२ रोजी देण्यात आलेली आहे. तसेच, संबंधित ठेकेदार यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम, १९७५ चे प्रकरण ८ कलम २१(१) नुसार दि.२०/०१/२०२२ रोजी उपनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या विषयासंदर्भात नगर विकास विभागाकडे तक्रार दाखल करून संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत व केलेल्या कारवाईबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने या प्रकरणी नाशिक महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मा.विधानसभा सदस्या यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील पोयसर नदीच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ३८४१२ (२५-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने विविध करांसह १४२८ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल २०२० मध्ये सदर प्रकल्पासाठी ५४० कोटींचा अंदाज महानगरपालिकेकडून व्यक्त करण्यात आला असून तदनंतर ७५१ कोटी इतका खर्च निश्चित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे वारंवार विविध प्रकारच्या निविदा प्रक्रिया राबवून मुंबई महानगरपालिकेच्या धोरणामुळे सदर प्रकल्प मागील अनेक वर्षापासून प्रलंबित राहिला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पोयसर नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महापालिकेकडून नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) मुंबईतील पोयसर नदीच्या पुनरुज्जीवनाच्या कामाची एकूण अंदाजित किंमत विविध प्रकारच्या करासहित रु. १४८२.३९ कोटी इतकी आहे व सदर कामाकरिता माहे जानेवारी, २०२२ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे.

(२) सदर कामाकरिता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये रु. ५४० कोटीचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला. तसेच, तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेऊन तांत्रिक सल्लागार समिती स्थापित करुन सदर प्रकल्प आराखड्याची सखोल तपासणी करण्यात आली व दिनांक ०३.०२.२०२० रोजी तांत्रिक सल्लागार समितीची बैठक झाली.

तांत्रिक सल्लागार समितीने ट्रीटमेंट टेक्नॉलॉजी तसेच उपचार पध्दती संदर्भात सखोल अभ्यास करुन ट्रीटमेंटची प्रक्रिया ठरवून घेतली. राष्ट्रीय हरित लवाद व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी ठरविलेल्या मापदंडाच्या आधारे आराखड्यास मान्यता देऊन पूर्वी ठरविलेली ओपन टेक्नॉलॉजी न घेता एम.बी.आर. (Membrane Bio-Reactor) टेक्नॉलॉजी निश्चित करण्यात आली. तसेच एच.डी.डी. (Horizontal Directional Drilling) प्रणालीचा उपयोग करुन झोपडपट्टयांच्या खालून मलनि:सारण प्रणालीचे काम करण्याचे ठरले.

उपरोक्त नमूद बाबींमुळे सदर प्रकल्पाची अंदाजित रक्कम माहे मार्च, २०२० मध्ये रु. ५४० कोटीवरुन रु. ७५१ कोटी इतकी निश्चित करण्यात आली व त्यास तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यास ६ वेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर निविदापूर्व बैठकीच्या अनुषंगाने तसेच कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व निविदाकारांच्या वेळोवेळी आलेल्या विनंतीनुसार एकूण १३ वेळा पुन:श्च मुदतवाढ देण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) पोयसर नदीच्या पुनरुज्जीवर प्रकल्पाची निविदा काढून कंत्राटदार नेमून त्याला महानगरपालिकेच्या स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली आहे. तसेच कंत्राटदाराला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यालयीन आदेश देण्यात आला असून, सदर प्रकल्पाचा कालावधी ३६ महिने (पावसाळा वगळून) असून सदर प्रकल्प नमूद केलेल्या कालावधीत पूर्ण करुन घेण्याची खबरदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## मुंबईतील मुलुंड (पश्चिम) येथील पंडित दिनदयाल उपाध्याय मार्ग येथील स्मशानभूमीतील बंद असलेली गॅस दाहिनी सुरु करण्याबाबत

**(२७) ३८५०१ (१८-०४-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड (पश्चिम) मधील पंडित दिनदयाल उपाध्याय मार्ग येथील स्मशानभूमीतील गॅस दाहिनीच्या दुरुस्तीचे काम मुंबई महानगरपालिकेने केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरुस्ती काम होवूनही गॅस दाहिनी सुरु झालेली नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना कोविडच्या मृत्यूदेहास भांडुन येथे घेऊन जावे लागत असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात येऊन सदरहू दुरुस्ती काम होवूनही स्मशानभूमीतील गॅस दाहिनी सुरु करण्यात आली नसल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर स्मशानभूमीतील गॅस दाहिनी तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) मुलुंड (पश्चिम) येथील पंडित दिनदयाल उपाध्याय मार्ग येथील खाजगी हिंदू स्मशानभूमीतील गॅस दाहिनी खाजगी स्वरुपाची असून ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत नाही.

माहे मार्च, २०२० मध्ये दिवंगत झालेल्या कोविड रुग्णांना गॅस दाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात यावे असे निर्देश कोविड प्रोटोकॉलनुसार देण्यात आले होते. तसेच मुलुंड परिसरात गॅस दाहिनी फक्त याच ठिकाणी उपलब्ध असल्यामुळे दिवंगत कोविड रुग्णांना अंत्यसंस्कारासाठी सदर स्मशानभूमीत आणले जात होते. परंतु सदर गॅस शवदाहिनी मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात बंद झाली. त्यामुळे कोविड रुग्णांच्या अंत्यसंस्काराची गैरसोय व्हायला लागली.

सदर गॅस शवदाहिनी खाजगी जागेत असल्यामुळे विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यतेने महानगरपालिकेमार्फत सदर गॅस शवदाहिनी तातडीने दुरुस्त करुन दिनांक २९.०७.२०२० रोजी मुलुंड नागरीक सभा संस्थेला हस्तांतरीत करण्यात आले. तद्नंतर सदर गॅस दाहिनीमध्ये कोविड रुग्णांचे अंत्यसंस्कार सुरु करण्यात आले असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०२० मध्ये सदर गॅसदाहिनी कार्यान्वित होती व त्या महिन्यात सदर गॅसदाहिनीमध्ये एकूण ४५ मृतदेहांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. तसेच, सदर स्मशानभूमीत गॅसदाहिनी व्यतिरिक्त एकूण ६ पायर्स देखील उपलब्ध आहेत. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांना इतरत्र जाण्याचा त्रास सहन करावा लागला नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबिस्ते खुर्द (ता.वाडा,जि.ठाणे) येथील जे.के.फाऊंडर्स या रासायनिक कंपनीमधून निघणाऱ्या विषारी धुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असल्याबाबत**

**(२८) ३८७७९ (०९-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबिस्ते खुर्द (ता.वाडा, जि.ठाणे) येथील जे.के.फाऊंडर्स या रासायनिक कंपनीमधून निघणाऱ्या विषारी धुरामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या भात, रब्बी पिक तसेच फळ पिकांचेही नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानीबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी गत तीन वर्षापासून कंपनीविरोधात तालुका कृषि अधिकारी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी, तहसिलदार, जिल्हाधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पर्यावरण मंत्री यांची भेट घेऊन स्थानिकांनी सदर कंपनीविरोधात पुरावे सादर करुन तक्रार दाखल केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही, तथापि, सदरील उदयोगात अल्युमिनिअम स्क्रॅप पासून ॲल्युमिनियम इंनगॉट बनविण्याच्या उदयोग कार्यरत आहे. या उद्योगाविरुध्द डिसेंबर २०२१ मध्ये तक्रार प्राप्त झाली होती. याबाबत तालुका कृषी अधिकारी, वाडा यांच्याकडून दि. ११/०२/२०२२ रोजीच्या अहवालानुसार भात शेतीचे अल्प प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिसून येते. कंपनी संचालकास सुचना देऊन सदर बाबीचे नियंत्रण करुन भात शेतीचे होत असलेले पीक नुकसानीस प्रतिबंध करणे शक्य आहे. तसेच दिनांक ११/२/२०२२ रोजीच्या स्थळ पाहणी दरम्यान कंपनीतुन बाहेर पडणारे सांडपाणी शेतकऱ्यांच्या शेतात जात असल्याचे आढळून आले नाही.

(२), (३), व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तक्रारीच्या अनुषंगाने सदरील उदयोगास दि. १६/१२/२०२१ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन भेटी दरम्यान आढळलेल्या त्रुटींनुसार अंतरिम आदेश दिनांक २१/१२/२०२१ रोजी बजावण्यात आले असून रु. एक लाखाची बँक हमी जप्त करुन दंडात्मक कारवाई करण्यात आली.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**वडगाव शेरी (जि.पुणे) येथील खराडी स.नं.१६/४ अ येथे नदीवर खाजगी सहभागातून पूल बांधण्याचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीने मंजूर केल्याबाबत**

**(२९) ३९०५६ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव शेरी (जि.पुणे) येथील खराडी स.नं.१६/४ अ येथील नदीवर खाजगी सहभागातून पूल बांधण्याचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीसर पीएमआरडीएकडे असताना काही बांधकाम व्यावसायिकांनी हा पूल स्वखर्चाने उभारून देण्याची तयारी दर्शवत प्रस्ताव दिला असून तो प्रलंबित ठेवण्यात आला आहे काय तसेच प्रस्तावित पुलासाठी किती खर्च येणार आहे,

(३) असल्यास, सदर गावे मनपा हद्दीतील असल्याने मनपा निधीतून पुल बांधण्यासाठी निविदा मागावण्याचे कारण काय आहेत तसेच पालिकेच्या वतीने विकास आराखड्यात नसलेला पूल डीपीतील आरक्षित पुल वगळून बांधण्याचे नियोजन का करण्यात आले आहे,

(४) असल्यास, सदर पुलाचे काम वगळून डीपीमध्ये अस्तित्वात जागी पूल बांधण्यासाठी नागरिकांनी व लोकप्रतिनिधी यांनी तक्रारी व पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ठिकाणी डीपीमधील आरक्षित जागी पूल बांधण्याची निविदा मनपा कधी मागविणार असून, याबाबत अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर परिसर पी.एम.आर.डी.ए. कडे असताना पिन्नी व शरद सहकारी गृह रचना संस्था मार्यादित मुंढवा करिता श्री. अनिरुद्ध उत्तम सेवलेकर यांनी हा पुल स्वखर्चाने उभारण्याची तयारी दर्शविलेली होती. तथापि, तद्नंतरच्या कालावधीत पिन्नी सहकारी संस्थेने माघार घेतल्याने पुल बांधण्याचे काम प्रत्यक्षात झालेले नाही.

पुणे महानगरपालिकेमार्फत हाती घेतलेल्या प्रस्तुत पुलाच्या कामासाठी मान्य निविदेनुसार सर्व करांसहित रु. २६,६४,७६,१३४.९१+ भाववाढ सुत्रानुसार येणारी कमी/जास्त रक्कम या प्रमाणे खर्च होणार आहे.

(३) पी.एम.आर.डी.ए. अखत्यारित सदर परिसर असताना हा पुल प्रत्यक्षात विकसित झालेला नाही. सदर परिसर पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आल्यानंतर महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम, १९४९ चे कलम २०५ (अ) (क) नुसार खराडी व मुंढवा भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दोन भागांना जोडणाऱ्या नदीवरील पुलाची आखणी मुख्य सभा ठराव क्र.५९८, दि.२१/११/२०१९ नुसार करण्यात आलेली आहे. प्रस्तावित पुलाच्या खराडी व मुंढवा बाजूचे रस्ते विकसित असल्याने पुल बांधल्यानंतर पर्यायी वाहतुक मार्ग उपलब्ध होणार असल्याने, पुल बांधण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. विकास आराखड्यामध्ये स. नं. ६९,७० या ठिकाणी पुल दर्शविलेला आहे. मात्र या पूलाच्या दोन्ही बाजूच्या जागा ताब्यात नसल्याने पुलाचे नियोजन करुनही तेथे वाहतूक मार्ग सद्यस्थितीत सुरु होणार नसल्याने विकास आराखड्यातील पुलाचे काम तुर्तास हाती घेण्यात आलेले नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) विकास आराखड्यामधील खराडी स. नं. ६९, ७० येथे प्रस्तावित पुलाची आखणी आहे. मात्र प्रत्यक्षात पुलाच्या दोन्ही बाजूच्या रस्त्याची जागा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. तसेच तेथे रस्ते विकसित नाहीत. विकास आराखड्यातील सदर पुलाच्या दोन्ही बाजूच्या जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर व तेथील रस्ते विकसित झाल्यानंतर सदर पुलाचे काम हाती घेण्यात येईल. तसेच पुलाच्या व ॲप्रोच रस्त्याच्या कामासाठी तरतूद प्रस्तावित करण्यात येईल, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगर पालिकेच्या नवीन विस्तारित इमारतीमध्ये मुख्य सभागृह बांधणे बाबत

**(३०) ३९०५७ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर पालिकेच्या नवीन विस्तारित इमारतीमध्ये मुख्य सभागृह बांधणे बाबत किती निविदा मागवल्या आहेत, त्यानुसार सदर मुख्य सभागृह बांधण्यासाठी एकंदरीत किती खर्च आला असून, कोणकोणत्या ठेकेदार कंपन्यांना कार्यदेश देण्यात आला आहे,

(२) असल्यास, मुख्य सभागृह बांधताना पूर्वगणक पत्र बनवताना कोणकोणत्या बाबींना इष्टीमेंट कमिटीची मान्यता घेतली असून, निविदेतील बॅफल सिलिंग पॅनल, केमप्रोल वॉटर प्रुफिंग, ड्यूराकॅप डिंपल केमिकल या तिन्ही वस्तूंचे दर मान्यता घेताना सदर दर तत्कालीन बाजार भावाशी सुसंगत आहेत याची खातर जमा केली होती काय तसेच तिन्ही वस्तुंना काय दर देण्यात आले आहेत,

(३) असल्यास, इमारत उदघाटन दिनी कार्यक्रम सुरू असतानाच सभागृहात पाऊसाच्या पाण्याची गळती सुरू झाली काय असल्यास, सदर वॉटर प्रुफिंग आयटेम पोटी ठेकेदारास किती रक्कम देण्यात आली असून, सदर कामाचा दर्जा कोणामार्फत तपासण्यात आला असून, सदर दुरुस्ती चे काम अन्य कंपनी कडून करून घेण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या नवीन विस्तारीत इमारतीमधील मुख्य सभागृह हा विस्तारीत इमारतीच्याच निविदेचा भाग असल्याने मुख्य सभागृह बांधण्यासाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात आली नाही. मुख्य सभागृहासाठी अॅकॉस्टीकल कामे, फर्निचर व्यवस्था, बैठक व्यवस्था, वॉटरप्रुफिंग इत्यादी कामांसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे. विस्तार इमारतीचे काम मे. के. आर. ट्रेडर्स यांच्याकडून तर फर्निचर, बैठक व्यवस्था, अॅकॉस्टीकल कामे, वॉटर प्रुफिंग ही कामे मे. रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचेकडून करण्यात आली आहेत.

(२) सर्व निविदांना पुणे महानगरपालिकेच्या तांत्रिक समितीची (इस्टिमेट कमिटीची) मान्यता घेण्यात आलेली आहे. या तीनही बाबींसाठी प्रचलित कार्यपद्धतीनुसार दर निश्चित केले आहेत.

बॅफल सिलिंग पॅनल - र. रु. १०,०००/- चौमी.

केमप्रोल वॉटर प्रुफिंग - र. रु. ३५००/ चौमी.

डयुराकॅप डिंपल केमिकल - र.रु. १२७२/ चौमी.

(३) होय.

विस्तारीत संपूर्ण इमारतीच्या वॉटर प्रुफिंगसाठी र. रु. ९०,११,०६७/- अदा करण्यात आले आहे. या कामासाठीचे सल्लागार, इंजिनिअरींग इंडिया लि., तसेच संपूर्ण इमारतीचे कॉम्प्रीहेन्सीव्ह ऑडीट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांच्याकडून करुन घेण्यात आले आहे. कोणत्याही अन्य कंपनीकडून दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महापालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाच्या विकास कामांत मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि गैरकारभार झाल्याबाबत

**(३१) ३९०६१ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाच्या नगरसेवकांच्या ‘स’ यादीतील विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात होणारी अनियमितता आणि गैरकारभार झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या दक्षता विभागाने केलेल्या चौकशी दरम्यान अनेक कामांच्या निविदांच्या नस्ती मिळाल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गहाळ झालेल्या नस्तीबाबत तसेच महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२३) :**(१) प्राथमिक चौकशीमध्ये काही प्रकरणी अंशत: प्रशासकीय अनियमितता आढळून आलेली आहे, हे खरे आहे.
(२) आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडील एकूण ६२ कामांची निविदा यादी प्राप्त झालेली असून त्यापैकी ३६ निविदा प्रकरणे दक्षता विभागाकडे प्राप्त झालेली आहेत व उर्वरित प्रकरणे सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे उपलब्ध असून कोणतेही प्रकरण गहाळ असल्याची नोंद नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) काही प्रकरणांमध्ये प्राथमिक चौकशीत अनियमितता आढळून आली असून त्यानुषंगाने पुढील चौकशी सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील रामटेकडी येथील साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेने निविदा न काढता काम दिल्याबाबत

**(३२) ३९०६३ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील रामटेकडी येथील साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेने निविदा न काढता विशिष्ट ठेकेदाराला काम दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी निविदा न काढता विशिष्ट ठेकेदाराला काम देण्याचे प्रयोजन काय आहे,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत पुणे महानगरपालिकेत कचरा प्रक्रियेसाठी पाचशे ते सहाशे रुपये इतका दर असताना रामटेकडीतील कामांसाठी नऊशे रुपये एवढा अवाजवी दर दिला असून, विशिष्ट ठेकेदाराला अवाजवी दर देण्याचे कारण काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी रामटेकडी कचरा प्रकल्पातील किती कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली असून त्यासाठी किती रक्कमेची देयके ठेकेदाराला अदा करण्यात आली आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून निविदा न काढता काम दिल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०१-२०२३) :** (१) व २) रामटेकडी येथे साठलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे व प्रक्रिया करणे या करिता पोर्टेबल यंत्रणेद्वारे प्रक्रिया करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

या निविदेमध्ये चार निविदा धारक पात्र ठरले होते.

काम तातडीचे असल्याने व साठलेल्या कचऱ्याचे परिमाण जास्त असल्याने चारही पात्र निविदा धारकांस कार्यादेश देण्यात आले होते.
(३) निविदेमध्ये प्राप्त किमान दर रु. ८७५/- प्रती मे. टन असा होता. सदर दर वाजवी असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) रामटेकडी येथील प्रक्रियेविना शिल्लक कचरा १६४८ मे. टन एवढा असून उर्वरित कचऱ्यावर प्रक्रिया झालेली आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क व निविदेमधील झालेल्या कलमानुसार प्रत्यक्ष अदा केलेली बिलाची रक्कम रु. ८,३८,१५,४९०/- एवढी आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा भाईंदर शहरातील वृक्षतोडी प्रकरणाच्या मंजुरीबाबत

**(३३) ३९२३७ (१८-०४-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने राज्यातील विविध भागात वृक्ष तोडण्यावर नियंत्रण असावे याकरिता राज्य शासनाने वृक्ष प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध विकासकामे व इतर कामांसाठी मोठ्या संख्येने झाडे तोडण्याच्या प्रक्रियेची छाननी करण्याचे अधिकार या प्राधिकरणास देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकास्तरावर झाडे तोडण्याबाबत होणाऱ्या निर्णयांनाही राज्य शासनाने स्थापन केलेल्या वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी घ्यावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मिरा-भाईंदर महानगपालिका स्तरावर आतापर्यंत वृक्षतोडीच्या किती प्रकरणास प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे, व स्थगिती दिली आहे , नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०१-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

महानगरपालिका हद्दीतील झाडे तोडणेकरिता खालील प्रमाणे अधिकार आहेत.

१) १ ते २५ झाडापर्यंत महानगरपालिका आयुक्त.

२) २६ ते २०० झाडापर्यंत महानगरपालिकेतीलवृक्ष प्राधिकरण समिती.

३) २०१ झाडांपेक्षा जास्त झाडापर्यंतचे अधिकार शासन स्तरावरील महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणस अधिकार आहेत.

४) ५० वर्षापेक्षा जास्त वयाची हेरिटेज वृक्ष असल्यास शासन स्तरावरील महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणस अधिकार आहेत.

(४) मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार अद्यापपर्यंत एकही प्रस्ताव शासन स्तरावरील महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी करीता सादर केलेला नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मे.एस.डब्ल्यू.स्टील कोटेड प्रा. लि. कंपनीमध्ये वायू, ध्वनी व पाणी प्रदूषण होत असल्याबाबत

**(३४) ३९२६१ (०९-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मे.एस.डब्ल्यू.स्टील कोटेड प्रा. लि. कंपनीमुळे वायू, ध्वनी व जल प्रदूषण होत असल्याबाबत कुणबी महोत्सव प्रतिष्ठान कोकण विभाग यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्याकडे सन २०२० मध्ये तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनी प्रशासनावर जिल्हाधिकारी तसेच कामगार आयुक्त यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाणकोट खाडी ते केंबुली (जि.रायगड, ता.महाड) येथे पुराचा धोका कमी होण्याच्या दृष्टीने ड्रेझिंग करण्यास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(३५) ३९८७६ (०९-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाणकोट खाडी ते केंबुली (जि.रायगड, ता.महाड) येथे पुराचा धोका कमी होण्याच्या दृष्टीने ड्रेझिंग करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडीपात्र खोल जावून संभाव्य पुराचा धोका टाळण्याच्यादृष्टीने ड्रेझिंग परवानगी देण्याबाबतचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, असल्यास त्याची कार्यवाही कधीपर्यत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाचे सुधारीत वाळू/रेती निर्गती धोरण, दि.२८.०१.२०२२ नुसार यांत्रिकीद्वारे लिलाव पध्दतीने सावित्री नदी बाणकोट खाडी पात्रामधील वाळू/रेती निर्गतीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयात मदतीस पात्र लाभार्थी निकषात सुधारणा करुन शेतकमजूरांना अंतर्भूत करण्याबाबत**

**(३६) ३९९०३ (१९-०४-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती च्या निकषांच्या लाभार्थी संकल्पनेत बहुतांशी प्रमाणात पिकांच्या नुकसानीबरोबरच शेतक-यांचा आधार असलेले पशुधन पाण्यात वाहून जाणे अथवा वीज पडून जनावरे दगावणे अशा घटना घडून जनावरे दगावल्यास दिनांक १३ मे, २०१५ अन्वये पात्र लाभार्थ्यांना आर्थिक मदतीच्या संकल्पनेत केवळ अत्यल्पभूधारक व अल्पभूधारक शेतक-यांना समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एखादया शेतमजूरांचे पशुधन नैसर्गिक आपत्तीत दगावल्यास सदरहू पात्र संकल्पनेत उत्पन्ननाचे साधन म्हणून पशुधन सांभाळणा-या शेतमजूराचा समावेश करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल व वन विभागाच्या दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयात मदतीस पात्र लाभार्थी निकषात सुधारणा करुन शेतकऱ्यांना अंतर्भूत करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) होय.

(२) होय, सध्या केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना त्यांचे पशुधन दगावल्यास मदत अनुज्ञेय आहे.

(३) नैसर्गिक आपत्तीमुळे पशुधनाच्या हानी झालेल्या शेतमजूरांना देखिल हि मदत अनुज्ञेय करणे यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. केंद्र शासनाने दि. १०/१०/२०२२ च्या आदेशानवये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित निकष व दर निश्चित केले असून त्यामध्ये भूमीहिन पशुधन मालकांचा पशुधनाच्या नुकसानीसाठी मदत देण्याकरीता समावेश केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील चांदिवली, घाटकोपर, कुर्ला विभागात सुसज्ज खेळाचे मैदान व रुग्णालय बांधण्याबाबत**

**(३७) ३९९३२ (१८-०४-२०२२). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चांदिवली, घाटकोपर, कुर्ला विभागात महानगरपालिकेचे एकही अद्ययावत मैदान तसेच रुग्णालय नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी मैदान नसल्याने तरुणांना खेळापासून वंचित राहत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षित भूखंडावर (नगर भूमापन क्र.(११ ए /३) राजावाडी रुग्णालयाच्या धर्तीवर "भव्य व सुसज्ज अद्ययावत रुग्णालय तसेच शहाजी राजे क्रिडा संकुल (अंधेरी स्पोटर्स क्लब) धर्तीवर "भव्य व सुसज्ज अद्ययावत खेळाचे मैदान'' तातडीने बांधून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे आयुक्त, मा.मंत्री, सचिव आदिंकडे पत्रव्यवहार करुनही माहे सप्टेंबर व डिसेंबर, २०१९ पासून आजतागायत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षित भूखंडावर (नगर भूमापन क्र. (११ ए /३) राजावाडी रुग्णालयाच्या धर्तीवर "भव्य व सुसज्ज अद्ययावत रुग्ण्यालय तसेच शहाजी राजे क्रिडा संकुल (अंधेरी स्पोटर्स क्लब ) धर्तीवर "भव्य व सुसज्ज अद्ययावत खेळाचे मैदान" तातडीने बांधून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) मुंबईतील चांदिवली, घाटकोपर, कुर्ला विभागात एकूण १८ (घाटकोपर येथे १२ व कुर्ला येथे ६) खेळाची मैदाने असून सदर परिसरातील मुलांकडून त्याचा दैनंदिन खेळासाठी वापर केला जातो.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सेठ व्ही.सी. गांधी व एम. ए. व्होरा मनपा सर्वसाधारण रुग्णालय (राजावाडी रुग्णालय) घाटकोपर येथे व के. बी. भाभा मनपा रुग्णालय, कुर्ला येथे कार्यरत आहे.

(३) व (४) मौजे चांदिवली येथील न.भू.क्र. ११अ/४ हा भूखंड रुग्णालय तसेच ११अ/३ हा भूखंड क्रिडांगणाकरिता आरक्षित आहे. सदर भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असून, त्यांच्या मालमत्ता पत्रकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नाव आले आहे.

मुंबईतील संघर्षनगर, चांदिवली येथे २५० रुग्णशय्येचे सुसज्ज आरोग्य सेवा पुरविणारे उपनगरीय रुग्णालय उभारण्याची कार्यवाही सुरु असून, सदर रुग्णालयासाठी आवश्यक त्या माध्यमिक आरोग्य सेवा सुविधा अंतर्भूत असणारे आराखडे महापालिका वास्तुशास्त्रज्ञ व आरोग्य सल्लागार यांचेमार्फत तयार झाले असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य पायाभूत सुविधा कक्षामार्फत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

घाटकोपर विभागातील न.भू.क्र. १ (भाग), कामगार नेते दत्ताजी साळवे खेळाचे मैदानाच्या नजिकचा भूभाग तरण तलाव व क्रिडा संकुलासाठी आरक्षित असून त्याठिकाणी तरण तलाव व क्रिडा संकुल उभारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

कुर्ला विभागातील न.भू.क्र. ११ए/३ या खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूभागाचा सर्वांगीण विकास करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत करण्यात येत असून भूभागाचे सीमांकन करुन आराखडे बनविण्यात आले आहेत. सदर प्रकरणी दिनांक ११.०१.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अंशत: बदल करण्याचे सुचविल्यानुसार सुधारीत आराखड्यामध्ये अंशत: बदल करुन त्याचे अंदाजपत्रक बनविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर प्रस्तावाकरिता प्रशासकीय मंजुरी प्राप्त करुन अर्थसंकल्पीय तरतूद सन २०२२-२३ मधून सदर काम करण्यात येणार आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ हा कायदा अंमलबजावणीबाबत

**(३८) ४०१३२ (१८-०४-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ हा कायदा दि. २९ नोव्हेंबर, २०११ रोजी रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ या कायद्यामधील उप कलम २० हे अद्याप रद्द न केल्यामुळे मंजूर असलेल्या सर्व योजनांची अंमलबजावणी मंजूर आदेशानुसार व योजना आदेशातील अटी व शर्ती नुसार पूर्ण करणे योजना धारकांवर बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनाधारक योजनेची मुदत संपुष्टात आल्यानंतर हि योजनेस मुदतवाढ घेत नसल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ हा दि.२९.११.२००७ पासुन स्विकारला आहे.

(२), (३) व (४) नाजकधा निरसन अधिनियमानुसार मूळ अधिनियमाच्या कलम २० अन्वये मंजुर करण्यात आलेल्या योजनांना सरंक्षण प्राप्त आहे. त्यामुळे योजनाधारकास कलम २० च्या सुटीच्या आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक आहेत.

नाजकधा कलम २० अन्वये मंजूर केलेली योजना विहीत कालावधीत पुर्ण न झाल्यास विलंबाची कारणे विचारात घेवून योजनांना विनादंडात्मक / दंडात्मक मुदतवाढ देण्यात येते. सदर दंडात्मक मुदतवाढ देण्याचे अधिकार शासन निर्णय दि.१८.०२.२०१५ नुसार संबंधित नागरी समुहांच्या जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांना प्रदान करण्यात आले असून, त्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तसेच योजनाधारक / योजनेचे विकासक, योजनेखालील ज्या क्षेत्राचा विकास शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ नुसार करणार असतील अशा योजनेखालील क्षेत्रासाठी प्रचलित वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यामधील दराच्या ३% दराने येणारे ‘अधिमुल्य’ दंडात्मक मुदतवाढीची रक्कम म्हणून एकरकमी आकारण्याबाबत शासन निर्णय दि.२३.०६.२०२१ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकामधील तरतूदी विचारात घेऊन नाजकधा कलम २० खालील योजना विहित कालावधीत पुर्ण झालेल्या नसल्या तरी, सदर योजनेखालील क्षेत्राच्या अधिकार अभिलेखातील कलम २० च्या नोंदी कायम आहेत. सदर योजना आदेशातील अटी व शर्तीनुसार योजना पुर्ण झाल्यानंतर अथवा शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ व दि.२३.०६.२०२१ नुसार विहित अधिमुल्य चालू रेडीरेकनर दराने शासनास अदा केल्यानंतरच योजनेखालील क्षेत्राच्या अधिकार अभिलेखातील कलम २० च्या नोंदी कमी करण्यात येतात. सबब, शासनाचे आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगाव जिल्ह्यातील जातपडताळणी समिती मार्फत नागरिकांना जात प्रमाणपत्र देण्यात विलंब होत असल्याबाबत

**(३९) ४०२९६ (०९-०४-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील जातपडताळणी समिती मार्फत नागरिकांना दिले जाणारे जात प्रमाणपत्र देण्यात विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जात प्रमाणपत्र देण्यात अधिकारी व कर्मचारी वर्गाची होणारी अनियमित अनुपस्थिती हे ही एक कारण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जात प्रमाणप्रत्र विलंबाने देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जाची पडताळणी करून निर्णय घेण्यासाठी नियमानुसार निश्चित केलेला कालावधी ३+२=५ महिने आहे. सन २०२०-२१ पासून ऑनलाईन जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रिया कार्यान्वीत झाल्यापासून आजतागायत शैक्षणिक २०६०८, निवडणूक १४५५, सेवा ९७७ असे एकूण २३०४० एवढी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. माहे फेब्रु, २०२२ अखेर समितीकडे १०६२३ प्रलंबित होती. त्यापैकी १०३६० प्रकरणे ३ महिने मुदतीतील, १८४ प्रकरणे ३ ते ६ महिने मुदतीतील व उर्वरित ७९ प्रकरणे १ वर्षाच्या मुदतीतील प्रलंबित होती.
समितीस्तरावर येणाऱ्या अर्जदारांना अर्ज सादर करणेबाबत मार्गदर्शन केले जाते तसेच अर्जदारास ईमेलव्दारे त्रुटी / वैधता प्रमाणपत्र पाठविली जातात. त्यामुळे संबंधिताना कार्यालयात वारवार यावे लागत नाही. अर्जदारांना त्रुटीचे निराकरण करणेबाबत वर्तमानपत्राव्दारे मार्गदर्शन / आवाहन करण्यात येते तसेच समिती मार्फत विशेष मोहिमांचे आयोजन करुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येते. सीईटी सेल मार्फत प्रवेश प्रक्रिया सुरू असताना प्राप्त प्रकरणे १५ दिवसाच्या आत निकाली काढण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे नाही. जळगाव समितीमध्ये सध्या सदस्य व सदस्य सचिव ही पदे रिक्त आहेत. तथापि, सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे देऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या जमिनीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(४०) ४०४४३ (२८-०३-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील उंद्री, अमडापूर मंडळात दिनांक १६ जून २०२१ रोजी वा त्यासुमारास तसेच दि. २८ व २९ जून २०२१ रोजी वा त्यासुमारास ढग फुटी होऊन अतिवृष्टीमुळे आमखेड, अंबाशी, एकलरा, गांगलगाव, पाटोदा, पिंपळवाडी, रोहडा व इतर गावातील शेतकऱ्यांची जमीन वाहून गेल्याने नापिक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहून गेलेल्या जमिनीची नुकसान भरपाई तातडीने देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि २७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री यांचेकडे दि. २९ सप्टेंबर व २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) बुलढाणा जिल्ह्यात माहे जुन, २०२१ मध्ये चिखली तालुक्यातील कोलारा महसूल मंडळात ५७.३० मि.मी. पाऊस पडला असून या मंडळातील गावांना शासनाच्या अतिवृष्टीच्या धोरणानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय होत नाही. तथापि, बुलढाणा जिल्हयामधील चिखली तालुक्यातील इतर तीन महसूली मंडळामध्ये अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या जमिनीच्या नुकसानीकरिता शासन निर्णय, दि. १९.०९.२०२१ अन्वये रू. १०८.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, मौजे आमखेड येथील सिंचन तलावाच्या मुख्य भिंतीला भगदड पडून शेतीपिकांचे नुकसान झाले असल्याने व सदर तलाव हा जिल्हा परिषद यांच्या मालकीचा

असल्याने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समितीच्या दि.२७.०७.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत बाधितांच्या नुकसानीपोटी मदत निधी देण्यासाठी जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी ग्राम विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करायचे निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील टेकड्यांवर बेकायदेशीर बांधकाम करुन टेकड्यांचे सपाटीकरण सुरु असल्याबाबत**

**(४१) ४०७८१ (२५-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील टेकड्या वाचविण्यासाठी जैव विविधता उद्यान पर्याय आणण्यात आला असला तरी टेकड्यांवर बेकायदेशीर बांधकामे सुरू असल्याची बाब दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिक्रमणांची बजबजपुरी, झोपड्या, चाळी, कच्ची बांधकामे मोठ्या प्रमाणात केले जात असून, जागा खरेदी विक्रीस मनाई असतानाही प्लॉट करून जागांची बेकायदा विक्री सुरू असणे, विनापरवाना उपहारगृह, बंगले बांधून टेकड्यांचे सपाटीकरण करणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०१-२०२३) :** (१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट गावांतील जैववैविध्य आरक्षणामध्ये अनधिकृत बांधकाम होत आहे, हे खरे आहे.
पुणे महानगरपालिका हद्दीतील बीडीपी सह इतर ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात आले असून पेठ निहाय पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.
अनधिकृत बांधकामांतील संबंधितांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत नोटीस देण्यात आलेल्या आहेत.
पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत बी.डी.पी. आरक्षणामध्ये अनधिकृतरित्या केलेल्या प्लॉटींगच्या सिमाभिंतीची कामे तसेच अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई पुणे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येत आहे.
बी.डी.पी. आरक्षित भागामधील अनधिकृत खोदाई अथवा टेकड्या सपाटीकरण/उत्खनन केल्यास तहसिलदार, महसूल विभाग यांना आवश्यक ती कारवाई करणेबाबत व संबंधित पोलीस स्टेशन यांना सदरचे अनधिकृत काम बंद करणेबाबत महानगरपालिकेमार्फत कळविण्यात येते. तसेच संबंधित व्यक्तींवर एम.आर.टी.पी. अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
पुणे शहरामधील हिल टॉप हिल स्लोप/बी. डी.पी. आरक्षित भागामध्ये जानेवारी, २०२२ पर्यंत बीडीपी मधील ८,५३,२३९ चौ. फुट अनधिकृत क्षेत्रासाठी २८४ नोटीस बजावल्या असून सुमारे ५,९३,७४५ चौ. फुट अनधिकृत क्षेत्र निष्कासीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर- तुळजापुर-उस्मानाबाद या महत्वाकांक्षी रेल्वे मार्गांसाठी राज्य शासनाने ५० टक्के निधीची तरतूद करण्याबाबत**

**(४२) ४१०१८ (०९-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर-तुळजापुर-उस्मानाबाद या रेल्वे मार्गास राज्य शासनाच्या हिस्स्याचा ५०% निधी देणेबाबत दिनांक ०७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व परिवहन मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिंधीनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापूर येथे येणाऱ्या भक्तांचा प्रवास सुखकर होण्यासाठी सोलापूर-तुळजापुर-उस्मानाबाद या रेल्वे मार्गास केंद्र शासनाचा ५० % हिस्सा व राज्य शासनाचा ५०% हिस्सा या धर्तीवर केंद्र शासनाकडून सदर रेल्वे मार्गास मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाच्या वाट्याच्या ५०% निधीस मंजुरी देऊन सदर निधी त्वरित उपलब्ध करुन देण्यासाठी मा.मुख्य अभियंता, सा.बां. विभाग, उत्तर मध्य रेल्वे, सीएसएमटी, मुंबई यांनी पत्र क्र. ईडब्यूम/१६६/बीए/ईबीआर (एफयु)/२०२१-२२ दि.१२.०७.२०२१ रोजी व त्याआधी देखील पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या आधी ५०-५०% हिस्स्याच्या अटीनुसार राज्यातील नगर-बीड-परळी, पुणे- नगर-नाशिक हे रेल्वे मार्गदेखील केंद्र शासनाने मंजुर केले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, तुळजापुर शहरास देशाच्या रेल्वेच्या नकाशावर आणण्यासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याच्या निधीची चालू आर्थिक वर्षात तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) होय.
(५) सोलापूर-तुळजापुर-उस्मानाबाद या नवीन रेल्वेमार्ग प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा ५०% आर्थिक सहभाग घेण्याबाबतचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २९.११.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**छत्रपती शिवाजी महाराज मंडई जमीनदोस्त करण्याकरिता स्पॉट कोटेशनला निविदा प्रक्रियेमध्ये नियमांचे पालन न करता गैरव्यवहार केला असल्याबाबत**

**(४३) ४११७६ (१८-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मधील छत्रपती शिवाजी महाराज मंडई जमीनदोस्त (Demolition) करण्याकरिता स्पॉट कोटेशनला निविदा मागविण्यात आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्पॉट कोटेशनला (spot quotation) निविदासाठी फक्त २४ तासाचा कालावधी देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास स्पॉट कोटेशनच्या (spot quotation) निविदा प्रक्रीयामध्ये नियमांचे पालन करण्यात आले नाही, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास भिवंडी पूर्व येथील लोकप्रतिनिधी यांना छत्रपती शिवाजी महाराज मंडई जमीनदोस्त (Demolition) करण्याकरिता स्पॉट कोटेशनला निविदा प्रक्रियेमध्ये नियमांचे पालन करण्यात आले नसून यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने आयुक्त यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने किंवा महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सदर निवेदनामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांस अनुसरुन उत्तर देण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मुंबईतील उद्याने देखभाल प्रक्रियेकरीता ४० टक्के कमी दराने निविदा सादर केल्याबाबत**

**(४४) ४१२९६ (१८-०४-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २४ विभागातील उद्याने, मैदाने, मोकळ्या जागा, रस्ता दुभाजक यांच्या देखभालीसाठी कमी दराने निविदा दाखल केल्या असून ४० टक्के कमी दराने कंत्राटदारांनी कामे करण्यास तयारी दर्शवली आहे मात्र कमी दरात कामाचा दर्जा कसा राखणार असाही प्रश्न उपस्थित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ करीता उद्याने देखभाल निविदा मागवल्यानंतर कंत्राटदारांनी कमी दराने बोली लावल्यामुळे कामाचा दर्जा व गुणवत्ता राखली जाणार नसल्याच्या कारणास्तव संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करून फेर निविदा मागवण्यात आल्या असून फेरनिविदाही ४० टक्के कमी दराने भरण्यात आल्या हे ही खरे आहे का,

(३) असल्यास शासनामार्फत उद्यानांच्या कामाचा दर्जा राखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निविदेकरिता सरासरी ४२.५० टक्के कमी दराने निविदा प्राप्त झाल्याकारणाने फेरनिविदा मागविण्यात आल्या. सदर फेरनिविदा मागविल्यानंतर सरासरी ३८.५० टक्के कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्या.

उद्याने, मैदाने, मोकळ्या जागा, रस्ता दुभाजक यांच्या देखभालीच्या कामाकरिता वस्तु व सेवाकर लागू नाही. त्यांच्या देखभालीसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री व अनुभवी मनुष्यबळ इ. कंत्राटदाराकडे स्वमालकीची उपलब्ध आहेत. तसेच देखभालीसाठी लागणारे साहित्य कंत्राटदारांना वाजवी दरात उपलब्ध होत असल्याने कंत्राटदारांनी कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उद्यानांच्या कामाचा दर्जा राखण्याच्या हेतूने योग्य त्या रितीने पर्यवेक्षण करुन निविदेतील अटी व शर्तींनुसार कंत्राटदारांकडून परिरक्षणाची कामे करुन घेण्यात येतील व त्याअनुषंगाने उद्यानाच्या कामाचा दर्जा राखला न गेल्यास कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतामधील पहिले डिजीटल ऑटोप्सीद्वारे शवविच्छेदन रुग्णालय**
**बृहन्मुंबई महानगरपालिकेत सुरु करणेबाबत**

**(४५) ४१३६८ (२५-०४-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतामधील पहिले डिजीटल ऑटोप्सीद्वारे मृतदेहाचे शव विच्छेदन करण्याची पद्धत जगभरातील अनेक देशामध्ये वापरली जाते, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, भारतामधील पहिले डिजीटल ऑटोप्सीद्वारे शव विच्छेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सुरु करण्याकरिता भिवंडी पूर्व विधानसभेचे लोकप्रतिनिधी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना दिनांक १ डिसेंबर, २०२० रोजी निवेदन दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाद्वारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०१-२०२३) :** (१) डिजीटल ऑटोप्सीद्वारे मृतदेहाचे शवविच्छेदन करण्याची पध्दत जगभरातील काही देशांमध्येच वापरली जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर पध्दतीद्वारे झालेले शवविच्छेदन न्यायालयीन प्रक्रियेत पुरावा म्हणून ग्राह्य धरले जात नाही. त्यामुळे सदर प्रकरणी अद्याप निर्णय झाला नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील जाहिरात फलकांना चुकीच्या पद्धतीने परवानगी दिल्याबाबत

**(४६) ४१५३५ (२५-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने शहरातील बहुतांशी जाहिरात फलकांना चुकीच्या पद्धतीने परवानगी व नुतनीकरण परवाने दिलेले आहेत तसेच सदर परवानगी दिलेले व नुतनीकरण परवाने दिलेले जाहिरात फलक जमिनीपासून ४० फुटापेक्षा जास्त उंचीवर, वाहतुकीच्या रस्त्यापासून १.५ मीटर अंतराच्या आतमध्ये, नाले व नदीपात्र तसेच पदपथ व रस्त्यावर उभे केले असून सदरील जाहिरात फलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीविताच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेमध्ये जाहिरात फलकासाठी स्वतंत्र विभाग असलेल्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने कारवाई करण्याचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर वर्ग केल्याने क्षेत्रीय अधिकारी व परिमंडळ उप आयुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण आल्याने जाहिरात फलकाचे काम सांभाळणे, कारवाई, परवानगी इ. कामे करणे अडचणीचे ठरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०१-२०२३) :** (१) पुणे महानगरपालिकेकडून पुणे शहरामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २४४, २४५ व जाहिरात व फलक नियंत्रण नियम २००३ च्या तरतुदीनुसार जाहिरात फलकांना परवानगी व नुतनीकरण देण्यात आलेले आहे, असे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(२) पुणे महानगरपालिकेच्या परवाना व आकाश चिन्ह विभागाचे क्षेत्रीय स्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आले आहे, हे खरे आहे. मात्र त्यामुळे काम करणे अडचणीचे होत आहे ही बाब खरी नाही.
मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १५५/२०११ मधील आदेशानुसार अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर इ. वर कारवाई करण्यासाठी संबंधित महापालिका सहायक आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय यांची जबाबदार तथा अंमलबजावणी अधिकारी / नोडल ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता, विकेंद्रीकरणानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यक्षमतेने कामकाज होत आहे. त्यानुसार त्यांचे अधिनस्थ परवाना निरीक्षकांमार्फत अनधिकृत फलकांवर दैनंदिन स्वरूपात निष्कासन कारवाई करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याबाबत

**(४७) ४१५४० (३०-०३-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचा शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास

निर्णय घेतला असून या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अप्पर सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व यावर किती खर्च अपेक्षित आहे, योजनेच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात करण्यात येईल व ही कामे केव्हा पूर्ण होतील याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या योजनेमध्ये प्रथम टप्प्यात महाराष्ट्रातील निवडक ९ प्राचीन मंदिरांचे जतन, संवर्धन आणि परिसर विकास करणे इ.गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. सदर कामांमध्ये पुरातत्व विभागाच्या पध्दतीनुसार मंदिराची दुरुस्ती / नुतनीकरण करणे प्रस्तावित असून मंदिराचा परिसर विकास, भाविकांसाठी सुविधा इ.कामे प्रस्तावित आहेत. या कामांसाठी रुपये १०१ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित केलेली आहे. ९ मंदिरांपैकी ३ मंदिरांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच ५ मंदिरांच्या अंदाजपत्रकांना पुरातत्व विभागाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्यांची निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल व एका मंदिरास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, सदर कामे मे, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील आंबेगाव बुद्रूक स.नं.४१ पार्ट दत्तनगर चौक येथील अनधिकृत बांधकामाबाबत

**(४८) ४३०१३ (२७-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील आंबेगाव बुद्रूक स.नं.४१ पार्ट दत्तनगर चौक येथे मान्य विकास आराखडयातील १८.०० मी रस्त्यामध्ये येणाऱ्या अनाधिकृत बांधकामे निष्कासित केली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे या रस्त्यावर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०१-२०२३) :** (१) होय, पुणे येथील आंबेगाव बुद्रुक स. नं. ४१ पार्ट दत्तनगर चौक येथे मान्य विकास आराखड्यातील १८.०० मी. रुंदीच्या रस्त्यामध्ये येणारी अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई दि.०५/०१/२०२२ रोजी करण्यात आली आहे, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्यावर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सुरु करण्यात आलेले आहे.
अस्तित्वातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई होऊन जागेवर सरासरी १५ ते १८ मी. रुंदीचा रस्ता उपलब्ध झालेला आहे.
रस्ता विकसनाच्या पहिल्या टप्प्यात साधारणत: दत्तनगर चौक ते टेल्को कॉलनी पर्यंतच्या सुमारे ६०० मी. रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.
त्यामुळे नागरीकांना प्रशस्त रस्ता उपलब्ध झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील देवाची ऊरळी येथिल कचरा प्रकल्पातील क्षमता वाढविण्याबाबत

**(४९) ४३०२२ (२७-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट २३ गावांमुळे शहरातील कचरा निर्मितीत वाढ झाली असून दररोज २२०० ते २३०० मेट्रिक टन कचऱ्याची निर्मिती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाविष्ट गावांमध्ये २५० ते ३०० मेट्रिक टन कचऱ्याची निर्मिती होत असून या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा महापालिकेकडे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी देवाची उरुळी येथील कचरा प्रकल्पाची क्षमता वाढवण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०१-२०२३) :** (१) व (२) नव्याने २३ गावांच्या समावेशामुळे पुणे महानगरपालिकेची हद्द वाढली असून महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात दररोज अंदाजे १५० ते २०० मे. टन प्रतिदिन अतिरिक्त कचरा निर्माण होत आहे, हे खरे आहे.

वाढीव कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता महानगरपालिकेकडे पर्याप्त प्रक्रिया यंत्रणा उपलब्ध नसल्याने या कामाकरिता निविदा मागवून पर्यायी व्यवस्था उभारण्याचे कामकाज सुरु आहे.

तथापि, कचरा प्रक्रिया तात्काळ होणे आवश्यक असल्याने अस्तित्वातील काही प्रकल्पांमध्ये प्रक्रिया क्षमता वृद्धी करुन नवीन समाविष्ट २३ गावांतील कचरा प्रक्रियेसाठी नजिकच्या कचरा प्रकल्पांमध्ये स्विकारण्यात येत आहे.

(३) देवाची ऊरुळी येथील २०० मे. टन कचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता वाढविण्याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु असल्याचे पुणे महानगरपलिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५०) ५५०४७ (२५-०१-२०२३). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत सन २०२१-२०२२ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील महानगरपालिका प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते एस. टी. वर्क शॉपपर्यंत रस्ता करणेसाठी व तारकपूर बसस्थानक ते राधाबाई काळे विद्यालयापर्यंत रस्ता करण्याबाबतच्या कामांना मान्यता देऊन रु.१ कोटी इतका निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मंजूर केलेल्या रु.१ कोटीच्या निधीतून कामे सुरु करण्याऐवजी, सदर निधी वापरास शासनाने मनाई करुन कामांना स्थगिती दिल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकास कामे ही मागासवर्गीय घटकांसाठी असून लोकपयोगी असल्याने शासनाने दिलेली स्थगिती उठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये शासनाकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विकास कामांना शासनाने दिलेली स्थगिती उठवून ती कामे तातडीने सुरु करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२३) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) होय.
(४) सदर विकास कामांना स्थगिती देण्यात आलेली नव्हती, त्यास अनुसरुन दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.